
पाक्षिक

प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई ● वर्ष: 8 ● अंक: 13 ● 1 जुलै 2026 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.



निस्पृह कर्मयोगी










## UPSC अधिकारी 140

## MPSC अधिकारी 1124

सारथी



# मराठा युवकांचा देवाभाऊ



अध्यक्षीय मनोगत

# मराठा युवकांना बळ देणारे देवाभाऊ

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची २०१४ ते २०१९ ही मुख्यमंत्रीपदाची पहिली कारकीर्द महाराष्ट्राच्या राजकारणाला आणि समाजकारणाला नवे वळण देणारी ठरली. मुंबई, पुणे, नागपूर मेट्रो यासारखे पायाभूत सुविधा विकासाचे प्रकल्प याच काळात सुरू झाले. जलयुक्त शिवारसारखी शेतीला शाश्वत सिंचनाचा मार्ग उपलब्ध करून देणारी योजना याच काळात सुरू झाली. मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या राज्यव्यापी मोर्चांमुळे या समाजातील वेगवेगळे प्रश्न ऐरणीवर आले. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी देवेंद्रजींनी राज्य शासनामार्फत अनेक योजना सुरू केल्या. त्यातील एक म्हणजे 'सारथी' संस्थेची स्थापना. या संस्थेच्या माध्यमातून मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग यासारख्या स्पर्धा परिक्षांसाठी मोफत प्रशिक्षण दिले जाते. त्याचबरोबर उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, वसतिगृह सुविधा आणि कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले जाते. काही दिवसांपूर्वी महायुती सरकारने ओबीसी प्रवर्गातील काही योजनांचा लाभ मराठा समाजाला देण्याचा निर्णय घेतला आहे. एकूणच देवेंद्रजी फडणवीस यांनी मराठा समाजाचे प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी मूलगामी उपाययोजना केल्या आहेत. गेल्या ८ वर्षात 'सारथी'तून प्रशिक्षण घेऊन १४० युवक केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून केंद्र सरकारच्या सेवेत रूजू झाले आहेत. एक हजारांहून अधिक युवक राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन राज्य सरकारच्या सेवेत दाखल झाले आहेत. 'सारथी'चा लाभ घेऊन सरकारी अधिकारी बनलेल्या युवक-युवतींचा नुकताच सत्कार आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात युवक-युवतींच्या पालकांनाही आमंत्रित करण्यात आले होते. एखादा राज्यकर्ता एखाद्या समाजासाठी दूरदृष्टीने किती निर्णय घेऊ शकतो, याची प्रचिती 'सारथी'च्या या कार्यक्रमात उपस्थितांना आली. देवेंद्रजींवर विरोधी पक्षातील अनेकांनी मराठा समाजाच्या मागण्यांवरून प्रचंड टीका केली होती. ही टीका अर्थातच राजकीय हेतूने होती. मुख्यमंत्री देवेंद्रजींनी या टीकेला कृतीने उत्तर दिले आहे. मराठा समाजातील तरुणांना उद्योग-व्यवसायाकरीता कर्ज देण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे देवेंद्रजींनी पुनरूज्जीवन केले. या महामंडळाला सातत्याने निधी उपलब्ध करून दिल्यामुळे मराठा समाजातील शेकडो युवक-युवती उद्योग-व्यवसायात यश मिळवत आहेत. देवेंद्रजींनी मराठा समाजासाठी घेतलेल्या अनेक निर्णयांची माहिती कार्यकर्त्यांनी सामान्य जनतेपर्यंत पोहचवली पाहिजे. या अंकात भारताने अलिकडेच अनेक देशांशी केलेल्या मुक्त व्यापार करारांची माहिती देणारा लेख प्रकाशित करण्यात आला आहे. त्याचबरोबर जागतिक राजकारणात भारताचे महत्व कसे वाढले आहे, याचे विश्लेषण करणारा ज्येष्ठ नेते माधव भांडारी यांचा लेखही या अंकात आहे. हे लेख सर्व कार्यकर्त्यांनी आवर्जुन वाचून त्याचे मनन करावे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार कोणत्या पद्धतीने विकसित भारतासाठी काम करत आहे, याची माहिती सामान्य कार्यकर्त्यांना असणे आवश्यक आहे.

पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते मुकुंदराव कुळकर्णी यांचे अलिकडेच निधन झाले. त्यांच्या निधनाने निष्ठावंत, निरलस कार्यकर्ता हरपला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाची ओळख करून देणारे विविध मान्यवरांचे लेख या अंकात आहेत. मुकुंदरावांसारख्या निरपेक्ष कार्यकर्त्यांमुळेच पक्ष आज यशाच्या शिखरावर पोहचला आहे. मुकुंदरावांना विनम्र श्रद्धांजली.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया, bjpmaha.manogat@gmail.com editor.bjpmanogat@gmail.com येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

मराठा समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध ०४



रक्तदानाचा महायज्ञ, विक्रमी सदस्य नोंदणी ०७



'महा कर्जमुक्ती' चा ऐतिहासिक निर्णय ०९




भारताने केले 6 वर्षांमध्ये 9 एफटीए १५



जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी भारत १७




पक्ष समर्पित व्यक्तिमत्व २०



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# मराठा समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध

> केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या पालकांच्या सन्मान सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले भाषण.




**मराठा** समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी शिक्षण, कौशल्य विकास, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, उद्योजकता आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित संधी उपलब्ध करून देण्याचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले असून, या उद्दिष्टासाठी स्थापन झालेल्या 'सारथी' संस्थेच्या माध्यमातून झालेले कार्य उल्लेखनीय आहे. सारथीच्या माध्यमातून आतापर्यंत केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारो घेण्यात येणाऱ्या परिक्षेत १४०, महाराष्ट्र लोकसेवा आयोग १ हजार १२४ आणि बँकिंग क्षेत्रात ५०० हून अधिक तरुण-तरुणी यशस्वी झाले आहेत. विविध कौशल्य विकास प्रशिक्षणांतून १३ हजारांहून अधिक युवक रोजगारक्षम झाले असून दोन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना विविध प्रशिक्षणांचा लाभ मिळाला आहे. मराठा समाजातील आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागे राहिलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार या तीन पैलूंवर आधारित धोरण राबविण्यात आले.

उच्च शिक्षण क्षेत्रात व्यावसायिक शिक्षणासाठी **मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शैक्षणिक शुल्कात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला.** मोठ्या शहरांत होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे, यासाठी वासतिगृह आणि भाऊसाहेब पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना सुरू करण्यात आली आणि विद्यार्थ्यांना ६० हजार रुपयापर्यंत आर्थिक सहकार्य करण्यास सुरुवात झाली. उद्योजकता विकासासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ गतिमान करण्यात आले आणि व्याज सवलत सुरू करण्यात आली. **या माध्यमातून पावणे दोन लाखापेक्षा अधिक उद्योजक तयार झाले असून साडेसात हजार कोटी रुपयांहून अधिक कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासाठी शासन वर्षाला १५०० कोटी देते.**

मराठा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी पोहोचविण्यासाठी सारथी संस्थेची स्थापना करण्यात आली. स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाबरोबरच संशोधन, पीएच.डी., कौशल्य विकास, रोजगाराभिमुख प्रशिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानातील कौशल्य विकसित करण्यासाठी सारथीने प्रभावी काम केले आहे. आज केवळ प्रशासकीय सेवाच नव्हे, तर







## 'मराठा म्हणावे या वाघराला!

राजकारणात अनेकदा सत्यापेक्षा अपप्रचार मोठा केला जातो. काही लोकांनी वर्षानुवर्षे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मराठा विरोधी ठरवण्याचा प्रयत्न केला. पण एखादा नेता समाजाच्या विरोधात आहे की समाजाच्या पाठीशी उभा आहे, हे घोषणांमधून नाही तर त्याच्या कामातून दिसते आणि त्याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे 'सारथी'. २५ जून २०१८ रोजी देवेंद्रजी फडणवीस यांनी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) स्थापन केली. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी समाजातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा हा ऐतिहासिक निर्णय होता.

*सारथीच्या माध्यमातून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षांमधून १४० आणि राज्य लोकसेवा आयोगाच्या परिक्षांमधून १ हजार १२४ विद्यार्थी अधिकारी झाले आहेत.* हे फक्त आकडे नाहीत; ही हजारो कुटुंबांची स्वप्ने पूर्ण झाल्याची कहाणी आहे. ज्या विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे मोठ्या शहरांतील महागडे क्लास परवडत नव्हते, त्यांना सारथीने मोफत प्रशिक्षण, शिष्यवृत्ती आणि योग्य मार्गदर्शन दिले. *याचबरोबर २ लाखांहून अधिक युवक-युवतींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण मिळाले आणि १३ हजारांहून अधिक तरुणांना रोजगार मिळाला.* ड्रोन पायलट प्रशिक्षण, उद्योजकता विकास, बँकिंग, ऑटोमोटिव्ह अशा आधुनिक क्षेत्रांतही सारथीने मराठा समाजातील तरुणांसाठी नवे दरवाजे उघडले.

परदेशात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती असो किंवा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या होतकरू मुलांसाठी आर्थिक मदत, सारथी संस्था आज हजारो कुटुंबांचा आधार बनली आहे. म्हणूनच एक प्रश्न विचारावासा वाटतो, जर एखादा नेता मराठा समाजाच्या विरोधात असता, तर त्याने मराठा समाजातील लाखो विद्यार्थ्यांसाठी अशी संस्था उभी केली असती का? समाजाच्या प्रगतीसाठी इतक्या योजना राबवल्या असत्या का? विरोधकांनी कितीही अपप्रचार केला, तरी सत्य हेच आहे की देवेंद्रजी फडणवीस यांनी मराठा समाजाला फक्त आश्वासने दिली नाहीत, तर 'सारथी'सारखी कायमस्वरूपी संस्था उभी करून हजारो तरुणांच्या भविष्याला नवी दिशा दिली. काही लोकांनी देवेंद्रजींना 'मराठा विरोधी' म्हणून बदनाम करण्याचा प्रयत्न केला. पण शब्दांपेक्षा काम मोठे असते... आणि 'सारथी' हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. म्हणूनच आज अनेक मराठा कुटुंबांच्या मनातून एकच भावना व्यक्त होते...

मराठा म्हणावे या वाघराला!

– प्रकाश गाडे




खासगी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणक तंत्रज्ञान, भाषा प्रयोगशाळा, टूल लॅब, ड्रोन तंत्रज्ञान यांसारख्या आधुनिक कौशल्यांकडे वळावे.

शेती क्षेत्रातही राज्य शासनाने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'महाविस्तार' ॲप सुरू केले असून सुमारे ५० लाख शेतकरी त्याचा वापर करत आहेत. ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीत मोठे परिवर्तन होणार असून त्यासाठी आवश्यक ड्रोन पायलट प्रशिक्षणही सारथीमार्फत सुरू करण्यात आले आहे. नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, लातूर आणि कोल्हापूर येथे सारथीची विभागीय केंद्रे, विद्यार्थी वसतिगृहे आणि प्रशिक्षण सुविधा उभारण्याचे काम सुरू असून पुढील वर्षभरात ही कामे पूर्ण होतील.

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थमंत्री असताना सारथीला आवश्यक निधी उपलब्ध करून दिला तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही निधीची कमतरता भासू दिली नाही. त्यामुळे सारथी आज सक्षम संस्थेच्या रूपात उभी राहिली असून त्यांचे योगदान महत्त्वाचे.

एमपीएससी परीक्षा वेळेत, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने घेण्यावर शासनाचा भर आहे. परिक्षांमध्ये ऑनलाईन पद्धतीबाबत विद्यार्थ्यांशी सविस्तर चर्चा




करूनच निर्णय घेतला जाईल. कोणताही निर्णय विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊनच होईल.

स्पर्धा परीक्षांमध्ये गुणवत्तेने पात्र ठरूनही जागा कमी असल्यामुळे नोकरी न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'निपुण सेतू' उपक्रम सुरू करण्यात येणार असून अशा विद्यार्थ्यांना खासगी क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल आणि त्यांच्या प्रशिक्षणाचा खर्च राज्य शासन उचलणार आहे. सारथी आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची कार्यालये एकत्र आणून विद्यार्थ्यांना आणि युवकांना एकाच ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचा विचार आहे. ■

# रक्तदानाचा महायज्ञ, विक्रमी सदस्य नोंदणी

प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारून एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी गेल्या वर्षातील संघटनात्मक कामकाजाचा आढावा अलीकडेच एका पत्रकार परिषदेत घेतला. यावेळी श्री.चव्हाण यांनी केलेल्या निवेदनाचा संक्षिप्त अंश.



प्रदेशाध्यक्षपद स्वीकारून एक वर्ष झाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.

**प्रदेशाध्यक्षपदाचे** एक वर्ष कामाच्या ओघामध्ये कधी निघून गेले ते कळलेच नाही. एका वर्षामध्ये जे-जे करता आले, संघटनात्मकदृष्ट्या पार्टीला मजबूत करण्यासाठी आवश्यक असणारे केंद्राने दिलेले वेगवेगळे उपक्रम असतील, त्याचबरोबर राज्य शाखेने नव्याने तयार केलेले उपक्रम असतील, या सर्व उपक्रमांमध्ये भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता त्याचबरोबर महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांमध्ये वैचारिकदृष्ट्या जोडले गेलेल्या अनेक संस्था, संघटना या सगळ्यांनी दिलेले सहकार्य त्यामुळेच हे सहजपणे शक्य झाले. भारतीय जनता पार्टीच्या सर्व कार्यकर्त्यांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे जवळपास एक कोटी ५१ लाखा इतकी प्राथमिक सदस्य नोंदणी करता आली. वर्षानुवर्षे पक्षाच्या विचारधारे बरोबर काम करणाऱ्या प्रत्येकाने केलेल्या प्रयत्नांमुळे दीड लाखापेक्षा अधिक सक्रिय सदस्य करता आले. हे सर्व करत असताना सर्व पदाधिकारी,कार्यकर्त्यांनी केलेली मेहनत, घरोघरी जाऊन पार्टीची विचारधारा प्रत्येकाला समजावून सांगून लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वामध्ये विकसित भारत आणि लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजींच्या नेतृत्वामध्ये विकसित महाराष्ट्र करण्याचा निर्धार भारतीय जनता पार्टीच्या छोट्या छोट्या कार्यकर्त्यांनी केला आहे, त्याबद्दल मी सर्व कार्यकर्त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देतो.

पक्षाचे काम करणे ही मोठी जबाबदारी आहे. देशाला परम वैभवाच्या दिशेने घेऊन जायचे असेल तर त्यामध्ये महाराष्ट्राची भूमिका सर्वात मोठी असणार आहे. त्यामुळे आपण सर्वजण काम करत असताना टीका-टिपणी, वाद अशा गोष्टीकडे दुर्लक्ष करत तळागाळातील प्रत्येक व्यक्तीला न्याय कसा मिळेल, सरकारच्या योजना त्यांच्यापर्यंत कशा पोहोचतील याकडे भारतीय जनता पार्टीच्या सर्व कार्यकर्त्यांनी लक्ष देणे हे अत्यंत गरजेच आहे. प्रत्येक क्षेत्र मग ते शेतकरी असतील कष्टकरी असतील किंवा कामगार असेल या प्रत्येक क्षेत्राला आणि तेथील अनेक वर्षांच्या समस्या असतील यांना खऱ्या अर्थाने न्याय देण्यासाठी आपण भारतीय जनता पार्टीचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी वर्षानुवर्ष काम करतो आहोत. या एका वर्षामध्ये ही प्रथा




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त २२ जुलै २०२५ रोजी भारतीय जनता पार्टीतर्फे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरांनी विश्व विक्रम प्रस्थापित केले. या महारक्तदान उपक्रमाची नोंद एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये झाली. त्याबद्दल एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या प्रतिनिधींनी भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना सन्मानित केले.

आणि परंपरा मी माझ्याबरोबर असणाऱ्या सर्व सहकाऱ्यांनी पुढे नेण्याचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने केले आणि त्याचाच परिणाम म्हणून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वामध्ये संपूर्ण देशभरामध्ये भारतीय जनता पार्टी आणि एनडीएला यश मिळत राहिले हे आपण सर्वजण पाहत आहोत.

महाराष्ट्रात सुद्धा भारतीय जनता पार्टी आणि एनडीएला म्हणजेच महायुतीला राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अतिशय चांगले यश मिळाले. महाराष्ट्रातील जनतेने दिलेल्या आशीर्वादामुळे भारतीय जनता पार्टीचे सर्वात जास्त लोकप्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निवडून आले आहेत. त्याबद्दल जनतेचे मी आभार मानतो. महाराष्ट्रातील २९ पैकी २४ महानगरपालिकांमध्ये महायुतीचे महापौर निवडून आले आहेत. १२ जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या त्यामध्ये सुद्धा महायुतीचाच डंका सर्वांना पाहायला मिळाला आहे. भारतीय जनता पार्टीचे सर्वाधिक महापौर, नगराध्यक्ष, जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती निवडून आले आहेत, हे सांगताना मला मोठा आनंद होत आहे.

भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक कार्यकर्त्यांने केलेली प्रचंड मेहनत मी वर्षभर अनुभवली आहे. 'सेवा ही संघटन' या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचा प्रत्येक कार्यकर्ता काम करतो. आपले नेते व लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी यांचा वाढदिवस गेल्या वर्षी आपण सेवा ही संघटनच्या माध्यमातून साजरा केला. प्रत्येक कार्यकर्त्यांने मेहनत केली. प्रत्येक कार्यकर्त्यांने रक्तदान शिबिरामध्ये भाग घेतला. त्यामुळे देवेंद्रजींच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ७८ हजारा पेक्षा अधिक लोकांनी एकाच दिवशी रक्तदान केले. हा मोठा विश्वविक्रम झाला. त्याचबरोबर पर्यावरण रक्षणाची जबाबदारी आपली आहे, या दृष्टिकोनातून सुद्धा एक पेड माँ के नाम या अभियानामध्ये जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक कार्यकर्त्याने बूथ पातळीवर मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. केवळ वृक्षारोपण नव्हे तर वृक्षांचे संवर्धन करण्यासाठीही आपले कार्यकर्ते मेहनत घेत आहेत. एका वर्षामध्ये आपण संघटनात्मकदृष्ट्या आणि राजकीयदृष्ट्या भारतीय जनता पार्टी अधिक मजबूत व्हावी या दृष्टिकोनातून कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी केलेली प्रचंड मेहनत आणि या मेहनतीमुळे आपण सर्वजण त्या दिशेने जाताना सर्वांना दिसतो आहोत. येणाऱ्या काळामध्ये महाराष्ट्रात फार मोठी आव्हाने आहेत. ही आव्हाने जर सर्वांना एका चांगल्या पद्धतीने आणि संघटनात्मकदृष्ट्या पुढे घेऊन जायची असतील तर आपल्याला कार्यकर्ता म्हणून प्रत्येकाने जबाबदारीने आपला पक्ष, पक्षाची संघटना आणि बूथ वरच्या असणाऱ्या रचना या पूर्ण करणे आणि बूथ वरच्या रचनांमध्ये प्रत्येक वेळेला जसे आपल्याला राष्ट्रीय अध्यक्ष सांगत आहेत की, प्रत्येकाला आपला बूथ मजबूत करण्याच्या दिशेने पावले उचलायची आहेत. एक वर्ष आपण अतिशय चांगल्या पद्धतीने या संघटनेमध्ये काम केले. परंतु यानंतरच्या काळामध्ये सुद्धा याच अपेक्षा आहेत की या एका वर्षांमध्ये केलेले काम यापेक्षाही अधिक चांगले गतिमान पद्धतीने काम पुढील काळामध्ये सर्वांना मिळून करायचे आहे. ■

# 'महा कर्जमुक्ती' चा ऐतिहासिक निर्णय

> शेतकरी राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.




**२०१७** मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही.

याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

### एकवेळ समझोता योजना (OTS)

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत कालावधी दिला जाणार आहे.

### प्रोत्साहनपर लाभ

नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु.५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील. तसेच, २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात पूर्णत: परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा ५ हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

### नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ मधील योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्वाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुर्नगठन/फेरपुर्नगठन थकीत हप्त्याची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत रक्कम रु. ५० हजार पर्यंत असल्यास पूर्ण कर्जमुक्ती आणि रु.५० हजारांपेक्षा जास्त असल्यास एकवेळ समझोता (OTS) योजनेचा लाभ मिळणार आणि रक्कम भरण्याची मुदत ३१ मार्च २०२७ असणार आहे.

### योजनेचे निकष

- पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती.
- १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू.
- ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश.
- ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश.
- जमीन धारणेची अट नाही.
- पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती.
- २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ.
- शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे.
- राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जांना लागू.

### कोण पात्र असणार नाहीत

- विद्यमान किंवा माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा व राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीचे विद्यमान किंवा माजी सदस्य.
- केंद्र किंवा राज्य शासनातील असे अधिकारी व कर्मचारी, ज्यांचे एकत्रित मासिक वेतन रु.२५ हजार पेक्षा अधिक आहे.
- राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ इ.) तसेच अनुदानित संस्थांतील रु. २५,००० पेक्षा अधिक मासिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारी.
- शेतीव्यतिरिक्तच्या उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती.
- निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे २५ हजार पेक्षा अधिक.
- मासिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (मात्र माजी सैनिकांना हा अपवाद लागू राहील).
- कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड तसेच सहकारी दूध संघ यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व रु. २५ हजार पेक्षा अधिक एकत्रित वेतन असलेले कर्मचारी. मात्र, सहकारी साखर कारखान्यांतील हंगामी कामगार या अपात्रतेतून वगळण्यात आले असून ते योजनेसाठी पात्र राहतील. ■

# मोदी सरकारकडून गेल्या बारा वर्षांत महाराष्ट्राला काय मिळाले?


● रवींद्र राऊळ

> गेल्या बारा नव्हे तर दहा वर्षे पाहिली तरी या कालावधीत केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला बारा लाख कोटी रुपये मिळाले. त्याआधी यूपीए सरकारच्या २००४ ते २०१४ या काळात महाराष्ट्राच्या वाट्याला केवळ २ लाख कोटी रुपये आले होते. यावरून दोन्ही सरकारमध्ये सहज तुलना करता येते.

**गेल्या** बारा वर्षांत केंद्र सरकारचे महाराष्ट्राला मिळालेले सर्वात मोठे आणि दृश्य योगदान कोणते असेल, तर ते म्हणजे पायाभूत सुविधांचा विकास. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील राष्ट्रीय महामार्गांचे जाळे कमालीचे विस्तारले गेले. मुंबई ते नागपूर दरम्यानचा 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' हा राज्य सरकारचा प्रकल्प असला तरी त्याला केंद्राकडून मिळालेली मंजुरी आणि निधीचे साहाय्य महत्त्वपूर्ण होते. याशिवाय, दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवेचा महाराष्ट्रातील भाग तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गांचे चौपदरीकरण आणि अष्टपदरीकरण यामुळे महाराष्ट्रातील दळणवळणाचा वेग कमालीचा वाढला. गेल्या बारा वर्षांत महाराष्ट्रात हजारो किलोमीटरचे नवे राष्ट्रीय महामार्ग तयार झाले, ज्याचा थेट फायदा राज्यांतर्गत व्यापाराला झाला. मुंबई, पुणे, नागपूर आणि नवी मुंबई या शहरांमध्ये मेट्रो प्रकल्पांचे जे जाळे निर्माण झाले आहे, त्यात केंद्र सरकारचा ५ हजार कोटींपेक्षा जास्त थेट निधी आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळवण्यासाठी दिलेली हमी अत्यंत












महत्त्वाची ठरली. मुंबई मेट्रोच्या विविध मार्गांसाठी आणि पुणे मेट्रोच्या विस्तारासाठी केंद्राने सातत्याने निधी मंजूर केला आहे. मुंबई आणि नवी मुंबईला जोडणारा देशातील सर्वात लांब सागरी सेतू 'अटल सेतू' (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक) हा महाराष्ट्राच्या शिरपेचातील मानाचा तुरा ठरला आहे. या प्रकल्पाच्या उभारणीत केंद्र सरकारची भूमिका आणि पर्यावरण मंजुऱ्यांची गतिशीलता महत्त्वपूर्ण होती. महाराष्ट्राला गेल्या १२ वर्षांत रेल्वे क्षेत्रासाठी केंद्राकडून अभूतपूर्व निधी मिळाला आहे. पूर्वीच्या रेल्वे अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या पदरात फारसे काही पडत नसल्याची तक्रार असायची, परंतु गेल्या काही वर्षांत हे चित्र बदलले.

**वंदे भारत एक्स्प्रेस :** देशातील पहिली हाय-स्पीड 'वंदे भारत' ट्रेन महाराष्ट्राला मिळाली. आज मुंबईहून शिर्डी, सोलापूर, मडगाव (गोवा), अहमदाबाद आणि नागपूर ते बिलासपूर अशा अनेक वंदे भारत ट्रेन महाराष्ट्रातून धावत आहेत. यामुळे महाराष्ट्रातील पर्यटनाला आणि व्यापारी प्रवासाला मोठी गती मिळाली आहे.

### रेल्वे अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी विक्रमी तरतूद

गेल्या काही आर्थिक वर्षांत महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी वार्षिक १५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीची तरतूद सातत्याने करण्यात आली. यात मुंबई उपनगरीय रेल्वेचे (लोकल) आधुनिकीकरण, ठाणे-दिवा पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेचे लोकार्पण, आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व इतर महत्त्वाच्या स्थानकांच्या पुनर्विकासाचा समावेश आहे. तसेच बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अहिल्यानगर-बीड-परळी आणि वर्धा-नांदेड या रेल्वे मार्गांच्या कामाला केंद्राने गती दिली.







**औद्योगिक कॉरिडॉर :** दिल्ली–मुंबई औद्योगिक कॉरिडॉर (DMIC) अंतर्गत छत्रपती संभाजीनगरजवळील 'ऑरिक सिटी' (URIC) हा देशातील सर्वात यशस्वी स्मार्ट औद्योगिक शहरांपैकी एक म्हणून विकसित झाला आहे. येथे अब्जावधी रुपयांची गुंतवणूक झाली असून हजारो तरुणांना रोजगार मिळाला आहे. दिघी पोर्ट औद्योगिक




क्षेत्राचा विकासही याच संकल्पनेतून होत आहे.

**वाढवण बंदर :** पालघर जिल्ह्यातील वाढवण येथे उभारण्यात येणारे बंदर हा केंद्र सरकारचा एक महत्त्वाकांक्षी मेगा–प्रकल्प आहे. सुमारे ७६ हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला केंद्र सरकारने अंतिम मंजुरी दिली असून हे बंदर जगातील पहिल्या १० मोठ्या बंदरांमध्ये स्थान मिळवेल असा अंदाज आहे.

टेक्स्टाईल पार्क (PM MITRA): अमरावती येथे केंद्र सरकारच्या 'पीएम मित्रा' योजनेअंतर्गत भव्य टेक्स्टाईल पार्क मंजूर करण्यात आले आहे, ज्यामुळे विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आणि वस्त्रोद्योगाला मोठा दिलासा मिळाला आहे.

### कृषी, सिंचन आणि दुष्काळ निवारण

महाराष्ट्र हा सातत्याने दुष्काळ आणि अवकाळी पावसाचा सामना करणारा प्रदेश आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने कृषी आणि सिंचन क्षेत्रासाठी महाराष्ट्राला विशेष सहकार्य केले.

**पंतप्रधान कृषी सिंचन योजना (PMKSY)**

महाराष्ट्रातील तब्बल २६ मोठ्या आणि मध्यम सिंचन प्रकल्पांचा समावेश या योजनेत करण्यात आला. यात विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक




रखडलेल्या धरणांच्या कामांना केंद्राने हजारो कोटी रुपयांचा निधी दिला, जेणेकरून राज्यातील सिंचन क्षमता वाढू शकेल. विशेष म्हणजे या योजनेअंतर्गत देशभरात जितकी धरणे बांधण्यात आली त्यातील ३० टक्के एकट्या महाराष्ट्रात आहेत. राज्य शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमधील सिंचन प्रकल्पांना विशेष निधी पुरवला गेला. सिंचन क्षेत्र वाढवणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे हे या योजनेचा मुख्य उद्देश आहे. केवळ महाराष्ट्र राज्यात राबवण्यात आलेल्या या योजनेंतर्गत राज्यात १०० धरणे पूर्ण करण्यात आली. या प्रकल्पांना केंद्र आणि राज्य सरकारकडून २५:७५ या प्रमाणानुसार अर्थसहाय्य देण्यात आले आहे. शिवाय केंद्र सरकारने राज्य शासनाला निधी उभारण्यासाठी नाबार्डकडून कर्ज घेण्यास मान्यताही दिली आहे.

### पंतप्रधान किसान सन्मान निधी (PM-Kisan)

या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सुमारे ८५ लाख ते १ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट प्रतिवर्ष ६ हजार रुपये जमा होत आहेत. राज्य सरकारने यात स्वतःची भर घातली असली, तरी केंद्राचा हा पायाभूत आधार ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा ठरला आहे.




**पीक विमा आणि आपत्ती व्यवस्थापन:** निसर्गाच्या लहरीपणामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले, तेव्हा राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी (NDRF) मधून केंद्र सरकारने महाराष्ट्राला वेळोवेळी आर्थिक मदत दिली आहे.

### नागरी विकास, आरोग्य आणि सामाजिक कल्याण

केंद्र सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा महाराष्ट्रातील कोट्यवधी जनतेला थेट लाभ झाला आहे.

**पंतप्रधान आवास योजना (PMAY):** महाराष्ट्रातील ग्रामीण भागात या योजनेतून ३८ लाखांहून अधिक लोकांना घरे मंजूर झाली आहेत. मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्प आणि म्हाडाच्या अनेक प्रकल्पांना केंद्राच्या धोरणात्मक निर्णयांचा फायदा झाला आहे.

**स्मार्ट सिटी मिशन:** राज्यातील पुणे, नागपूर, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर आणि पिंपरी-चिंचवड या शहरांची 'स्मार्ट सिटी' म्हणून निवड करून केंद्राने या शहरांच्या पायाभूत विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला.

**आरोग्य क्षेत्र :** नागपूर येथे उभारण्यात आलेले 'एम्स' (AIIMS) हे रुग्णालय विदर्भ आणि मध्य भारतासाठी वरदान ठरले आहे. तसेच 'आयुष्मान भारत' योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील लाखो कुटुंबांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचारांचे कवच मिळाले आहे. १४ व्या आणि १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार, केंद्र सरकारने महाराष्ट्राला मिळणाऱ्या कर परताव्याचा हिस्सा दिला आहे. गेल्या बारा वर्षांत महाराष्ट्राला केंद्रीय करांमधील वाटा म्हणून मिळालेली रक्कम आणि विविध केंद्रीय योजनांसाठी मिळालेला थेट अनुदान निधी यात जवळपास तिप्पट वाढ झाली आहे. जीएसटी लागू झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात महाराष्ट्राला मिळालेली नुकसानभरपाई ही देशात सर्वाधिक होती. ■

# भारताने केले 6 वर्षांमध्ये 9 एफटीीए



■ **भारत-न्यूझीलंड एफटीएम - एप्रिल, २०२६**
सर्वाधिक वेगाने होणारा एफटीए - ९ महिन्यांमध्ये पूर्ण.

■ **भारत-अमेरिका अंतरिम व्यापार आराखडा - फेब्रुवारी, २०२६**
भारत-अमेरिका यांच्या दरम्यान व्यापारी सामंजस्य कराराच्या दिशेने एक पाऊल.

■ **भारत-ईयू एफटीए - जानेवारी, २०२६**
२७ युरोपीय संघ सदस्य देशांबरोबर सर्वात मोठा व्यापारी करार.

■ **भारत-ओमान सीईपीए - डिसेंबर, २०२५**
जीसीसी देशांबरोबर सर्वात जास्त कर कवच असलेला सामंजस्य करार.

■ **भारत-इंग्लंड सीईटीए - जुलै, २०२५**
भारताच्या मालाला ९९ टक्के निर्यात शुल्क मुक्त पोहोच.

■ **भारत-ईएफटीए टीईपीए - मार्च, २०२४ ते ऑक्टोबर, २०२५**
१०० अब्ज डॉलर्सच्या थेट परकीय गुंतवणुकीविषयी कटिबद्धता असलेला ऐतिहासिक करार.

■ **भारत-ऑस्ट्रेलिया ईसीटीए - डिसेंबर,२०२२**
भारताचा पहिला करार, ज्यामध्ये १०० टक्के शुल्क समाप्तीची व्यवस्था.

■ **भारत-यूएई सीईपीए - मे, २०२२**
आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डॉलर्सच्या पुढे.

■ **भारत-मॉरीशस सीईपीए - २०२१**
आफ्रिकी देशांबरोबर भारताचा पहिला व्यापार सामंजस्य करार.

# मुक्त व्यापार करारातील (एफटीए) प्रमुख मुद्दे

■ २० अब्ज अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक करण्याचे वचन न्यूझीलंडने दिले आहे. भारतातील कृषी, उत्पादन उद्योग, पायाभूत सुविधांचा विकास, स्टार्ट-अप, नवोन्मेषी शोध आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही गुंतवणूक असणार आहे.

■ न्यूझीलंडने आत्तापर्यंत सर्वाधिक चांगल्या बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याची आणि सेवा देण्याची तयारी दर्शवली आहे. यामुळे कुशल व्यावसायिक, स्टार्ट-अप आणि सेवा-आधारित उद्योगांसाठी उच्च-मूल्यांच्या संधी उपलब्ध होतील. ११८ सेवा क्षेत्रांपर्यंत पोहोचण्याची सुविधा ढिली आहे. तसेच १३९ उप-क्षेत्रांमध्ये सर्वाधिक पसंती असलेले राष्ट्र (एमएफएन) म्हणून वचनबद्धता दर्शवली आहे.

■ १०० टक्के निर्यात – ज्या गोष्टी भारतातून न्यूझीलंडला जातील, त्या शुल्कमुकक्त पोहोचतील. यामध्ये सर्व शुल्कांचा समावेश आहे. वस्त्रे, चामडे, पादत्राणे, अभियांत्रिकी सामान, आणि प्रक्रिया केलेले खाद्य पदार्थ यासारख्या श्रमप्रधान क्षेत्रांतील उत्पादनांना विस्तारित बाजारपेठ मिळणार आहे. या निर्यातीत वाढ होईल.

■ न्यूझीलंडच्या इतर व्यापारी भागीदारीप्रमाणे भारतीय उत्पादनांच्या प्रवेशापासूनच शून्य शुल्क बाजारपेठेत पोहोचणे शक्य होईल. यामुळे ही उत्पादने न्यूझीलंडच्या बाजारपेठेत पूर्णतेने स्पर्धेत उतरतील आणि त्यांना समान संधी मिळेल.

■ हा व्यापार करार २०४७ सालापर्यंत विकसित भारत बनविण्यासाठी नवीन पिढींचा व्यापार सामंजस्य कर, प्रतिभा, गुंतवणूक आणि कृषी उत्पादकतेने युवक, शेतकरी, महिला, कारागीर आणि लघु तसेच मध्यम उद्योगांना सशक्त बनवणार आहे.

■ भारताने द्विपक्षीय व्यापार मूल्याच्या ७ टक्के हिस्सा व्यापणारा ७०.०३ टक्के शुल्क रेषेवर शुल्क उदारीकरणाचा प्रस्ताव मांडला आहे. याचबरोबर भारताच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या क्षेत्रांच्या रक्षणसाठी २९.९७ टक्के शुल्क रेषेच्या बाहेर ठेवले आहे.

■ शेतकरी – ग्रामीण अर्थव्यवस्था – देशांतर्गत उद्योगांच्या सुरक्षेसाठी प्रतिबंध असलेली उत्पादने: दुग्धधजन्य उत्पादने, पशु उत्पादने (मेंढींच्या मांसाव्यतिरिक्त), कृषी उत्पादने (कांदा, हरभरा, वाटाणा, मका, बदाम इ.) साखर, कृत्रिम मध, पशु, वनस्पती आणि तेल यांचा समावेश आहे. त्याचबरोबर हत्यारे, दारूगोळा, रत्ने आणि आभूषणे, तांबे आणि त्यापासून बनविलेल्या वस्तू (कॅथोड, काडतुसे, सळया, कॉईल इ.) अल्युमिनियम आणि त्यापासून बनविलेल्या वस्तू इ.

■ ३०% शुल्क असलेल्या उत्पादनांवरील शुल्क तात्काळ समाप्त करण्यात येणार आहे. यामध्ये लाकूड, लोकर, मेंढीचे मांस, चामडे-कच्चे चामडे यांचा समावेश आहे.

■ तसेच ३५.६ टक्के शुल्क आता ३५,७ आणि १० वर्षांच्या टप्प्याटप्प्याने समाप्त करण्यात येणार आहे. यामध्ये पेट्रोलियम तेल, माल्टाचा अर्क, वनस्पती तेल आणि काही निवडक विद्युत आणि यांत्रिक सामुग्री, पेप्टोन यांचा समावेश आहे.

■ न्यूझीलंडमध्ये शिक्षण घेतल्यानंतर कामासाठी व्हिसा : व्यावसायिक पद्धतीने विद्यार्थ्यांचे येणे-जाणे वाढावे, यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. यासाठी मर्यादा ठेवण्यात आली नाही. 'स्टेम' ची पदवी आणि पदव्युत्तर पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तीन वर्षांपर्यंत आणि डॉक्टरेट पदवी घेणाऱ्या संशोधकांना चार वर्षांपर्यंत शिक्षण घेणे आणि त्यानंतर काम करण्याचा अधिकार मिळेल.

■ भारतीय व्यावसायिकांसाठी हंगामी ५ हजारांचा विशेष रोजगार प्रवेश व्हिसा देण्यासाठी कोटा.

■ उत्पादकता, शेतकरी बांधवांचे उत्पन्न आणि ज्ञानाची देवाण-घेवाण यांना प्रोत्साहन देण्यात येणार. सफरचंद, किवी फळे आणि मनुका, मध यांच्यासाठी कृषी उत्पादन भागीदारी आणि 'उत्कृष्टता केंद्र.'

■ कृषी उत्पादकता सहकार्याबरोबरच कोटा आणि किमान आयात मूल्य यांच्या माध्यमातून नियंत्रित बाजार पोहोच वाढवून देशांतर्गत उत्पादनांची सुरक्षा सुनिश्चित होईल.

**निरीक्षण परीक्षणाला मान्यता : किफायतशीर औषधांचा विश्वासार्ह पुरवठा देश म्हणून भारताची स्थिती मजबूत करण्यासाठी शुन्य शुल्क फार्मास्युटिकल्स आणि वैद्यकीय यंत्र सामुग्रीसाठी 'फास्ट ट्रॅक' मंजुरीबरोबरच अमेरिका, ईयू, यूके, कॅनडाच्या नियमित परीक्षणाला मान्यता देण्यात आली आहे.** ■

# जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी भारत

## जी-७ शिखर परिषदेचे फलीत




● माधव भांडारी

> यावेळच्या जी-७ शिखर परिषदेचे महत्व जागतिक राजकारणाच्या दृष्टीने जेवढे मोठे आहे तेवढेच भारताच्या दृष्टीनेही मोठे आहे. कारण या परिषदेतून बदलती जागतिक राजकीय मांडणी स्पष्ट व्हायला सुरुवात झाली आहे, असे म्हणायला वाव आहे.

**जागतिक** राजकीय मांडणीत फार मोठे फेरबदल गेल्या काही वर्षांपासून चालू आहेत. मात्र बदलाची ही प्रक्रिया कोणत्या दिशेने जाते आहे आणि त्यातून नेमके काय निष्पन्न होणार आहे हे आतापर्यंत स्पष्ट होत नव्हते. यावेळच्या जी-७ परिषदेमध्ये हे चित्र काही प्रमाणात स्पष्ट व्हायला सुरूवात झाली आहे. जी-७ परिदषेमध्ये सदस्यत्व नसतानाही भारताला बोलवले जाण्याची ही काही पहिली वेळ नव्हती. आतापर्यंत १२-१३ वेळा भारताने या परिषदेत भाग घेतला आहे. डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना ते ५-६ वेळा या परिषदेला उपस्थित राहिले होते. मोदीजी आजवर ८ वेळा या परिषदेत सहभागी झाले आहेत. मात्र भारताचा पूर्वीचा सहभाग आणि यावेळचा सहभाग यात मोठी तफावत आहे. परिषदेसंदर्भातील अगदी छोट्या-मोठ्या गोष्टीतून हा फरक आपल्याला जाणवेल. परिषदेच्या उद्घाटनावेळी प्रथेप्रमाणे उपस्थित राष्ट्रप्रमुखांचे समूह छायाचित्र (Family Photo) काढण्यात आले. अशा प्रसंगांमध्ये अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष छायाचित्राच्या केंद्रस्थानी असतो. यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रंप यांच्या शेजारी मोदीजी उभे होते. या परिषदेच्या इतिहासात प्रथमच अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष आणि भारताचा पंतप्रधान हे छायाचित्रासाठी शेजारी शेजारी उभे होते. परिषदेच्या अखेरीस जे असेच समूह छायाचित्र (Family Photo) घेतले गेले त्यामध्येही प्रथेप्रमाणे परिषदेचे यजमान, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मध्ये उभे होते आणि त्यांच्या एका बाजूला ट्रंप व दुसऱ्या बाजूला मोदीजी होते. याचा अर्थ या परिषदेच्या यजमानांनी भारत आणि अमेरिका यांना एका समान स्थानावर ठेवले होते. या घटनेला मोठे महत्व आहे. भारत हा जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी पोचू लागला













आहे, असा याचा थोडक्यात अर्थ आहे.

या परिषदेचे आणखी एक महत्व म्हणजे इराणबरोबरचे युद्ध थांबवण्याची घोषणा करण्यासाठी ट्रंप यांनी स्थान निवडले ते जी-७ शिखर परिषदेचा मंच! भारतातील प्रसारमाध्यमांनी तसेच राजकीय विश्लेषकांनी याकडे लक्ष दिले नाही. पण, इराणबरोबरचे युद्ध थांबवण्याचा करार अमेरिकेने डिजीटल पद्धतीने केला. करारासाठी डिजीटल पद्धत का वापरली, याचे उत्तर ट्रंप यांनी दिलेले नाही. यातील आणखी एक महत्वाची बाब म्हणजे या करारात आपण मध्यस्थ आहोत, असे स्वतःहून सांगत फिरणाऱ्या पाकिस्तानला डिजीटल कराराच्या घोषणेची काहीही पूर्वकल्पना नव्हती. स्वित्झलर्ईंडमधील जिनेव्हा येथे या करारासाठीचा कार्यक्रम करण्याची तयारी पाकिस्तान मोठ्या बडेजावाने करत होता, निदान तसे दाखवत होता. असे असताना ट्रंप यांनी परस्पर जी-७ शिखर परिषदेच्या मंचावरून इराणबरोबरचे युद्ध थांबवण्याची घोषणा करत पाकिस्तानला एक जबरदस्त धक्का दिला. या शांतता कराराचे श्रेय ट्रंप यांनी कतारला दिले. गेले काही दिवस युद्ध थांबवण्याच्या हालचाली चालू असताना त्यामध्ये कतार कुठेही दिसत नव्हता. तरी ट्रंप यांनी कतारला शांतता कराराचे श्रेय दिले. त्याचबरोबर जिनेव्हाला होऊ घातलेल्या अमेरिका इराण बैठकीची सगळी व्यवस्था कतार करत आहे, हेही स्पष्ट झाले. हा शांतता करार घडवून आणण्यासाठी कतारने काय काय प्रयत्न केले, याची माहिती ना ट्रंप यांनी दिली ना कतारकडून दिली गेली. या करारामागचा खरा कर्ता करविता कोण, हे काही दिवसांनी बाहेर येईलच. पण या करारामागचे धागेदोरे उलगडताना भारत-कतार यांच्यातील मैत्रीची पार्श्वभूमी लक्षात घ्यावीच लागेल. गेल्या काही वर्षात भारत आणि कतार यांच्यातील संबंध अनेक पातळ्यांवर दृढ झाले आहेत. या संबंधांचा विचार अमेरिका-इराण यांच्यातील शांतता कराराच्या पार्श्वभूमीवर वेगळ्या अंगाने करायला हवा.

अमेरिका-इराण युद्धात पाकिस्तानने शांतीदूत म्हणून कशी महत्वाची भूमिका बजावली आणि भारताने ही संधी कशी गमावली याचे विश्लेषण करत अनेक आपल्या देशातील अनेक स्वयंघोषित परराष्ट्रनीती विश्लेषकांनी मोदी सरकारवर टीकेची झोड उठवली होती. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अभ्यासक म्हणवणारे हे विद्वान ट्रंप यांच्या जी-७ शिखर परिषदेतील घोषणेनंतर कुठे गायब झाले आहेत, हे कळत नाही.

या परिषदेत आणखी एक दृश्य पहायला मिळाले, ते म्हणजे परिदषेत किमान दोन-तीनवेळा डोनाल्ड ट्रंप हे एकटेच एका बाजूला उभे होते आणि अन्य प्रतिनिधी सभागृहातील दुसऱ्या बाजूला एकमेकांशी चर्चा करत होते, माहितीची देवाण-घेवाण करत होते. यूट्यूब किंवा इंटरनेटवर अन्य ठिकाणी या परिषदेच्या चित्रफिती पाहिल्यावर हा फरक लक्षात येईल. यापूर्वीच्या सर्वच परिषदांवेळी अमेरिकेच्या अध्यक्षांभोवती अन्य प्रतिनिधी एकत्र उभे असल्याचे दृश्य नेहेमीच पाहावयास मिळायचे.

ह्यावेळेस त्यात काही फरक पडला आहे.

१९४५ साली दुसरे महायुद्ध संपल्यानंतर निर्माण झालेल्या जागतिक रचनेत संपूर्ण युरोप अमेरिकेच्या पाठीमागे एकवटला होता. ते चित्र आता बदलायला लागले आहे. गेल्या काही वर्षात अमेरिका आणि युरोप यांच्यातील मैत्री संबंधात बराच दुरावा आल्याचे चित्र दिसत आहे. युरोप आणि अमेरिका यांच्यातील दरी रूंदावत असताना युरोप आणि भारत यांच्यातील मैत्रीसंबंध मात्र बळकट होताना दिसत आहेत. काही महिन्यांपूर्वी व्यापार कराराबद्दल भारत आणि अमेरिका यांच्या संबंधात कटुता निर्माण झाली असताना भारत आणि युरोपियन युनियन (EU) यांच्यात मुक्त व्यापार करार झाला. त्याचे वर्णन Mother of all Deals




अशा शब्दात केले गेले. प्रचंड व्याप्ती व आवाका असलेला हा 'मुक्त व्यापार करार' (FTA) करताना युरोपने अमेरिकेला विचारातही घेतले नाही. अमेरिकेला काय वाटेल याची चिंता युरोपीय राष्ट्रांनी त्यावेळेला केली नाही. या पार्श्वभूमीवर आताच्या जी-७ परिषदेमध्ये दिसू लागलेले बदलत्या जागतिक राजकीय पटाचे जे नवे चित्र समोर आले ते भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. या परिषदेच्या निमित्ताने हरित उर्जा (Green Energy), सायबर सुरक्षा, एआय, संरक्षण उत्पादने आदी मुद्यांबाबत अन्य सदस्य राष्ट्रांबरोबर मोदीजींनी केलेल्या विविध चर्चांचे तपशिल अजून स्पष्ट झालेले नाहीत. पण ह्या अत्यंत महत्वाच्या व दूरगामी परिणाम करणाऱ्या विषयांवर त्यांनी युरोपियन राष्ट्रप्रमुखांबरोबर व्यापक चर्चा केल्याच्या बातम्या आल्या आहेत.

या शिखर परिषदेच्या सांगता कार्यक्रमानंतर ट्रंप आणि मोदीजी यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. या परिषदेत ट्रंप बरेच काही बोलले. 'ऑपरेशन सिंदूर' नंतर भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष मीच थांबवला', असा दावा ट्रंप यांनी अनेकदा जाहीरपणे केला होता. त्यांच्या त्या वक्तव्यांवरून आपल्या देशातील विरोधकांनी व त्यांना साथ देणाऱ्या प्रसारमाध्यमांनी सरकारवर टीकेची झोडदेखील उठवली होती. पण या पत्रकार परिषदेत मोदीजी बरोबर असताना भारत-पाक युद्ध आपण थांबवले, अशा आशयाचा एक शब्दही ट्रंप यांनी उच्चारला नाही. माझ्या कारकीर्दीत मी ८ युद्धे थांबवली, असे ट्रंप यांनी याच पत्रकार परिदषेत सांगितले. मात्र या ८ युद्धामध्ये भारत-पाकिस्तानमधील संभाव्य युद्धाचा समावेश होता, असे ट्रंप म्हणाले नाहीत. याचाच दुसरा अर्थ भारत-पाकिस्तान ह्यांच्यातील संघर्षाच्या संदर्भात यापूर्वी ट्रंप जे काही बोलले होते त्या थापा होत्या. ट्रंप यांच्या भारत-पाकिस्तान मध्यस्थीबाबतच्या बढायानंतर मोदी विरोधकांना चेव चढला होता. भारताने अमेरिकेपुढे शरणागती पत्करली, अशा आशयाची टीका विरोधक सतत करत होते. ही सर्व मंडळी ट्रंप यांच्या वक्तव्यामुळे तोंडावर पडली आहेत.


युरोप आणि अमेरिकेतील संबंध आणखी ताणले गेले आहेत, युरोपीय राष्ट्रांना भारत अधिक विश्वासार्ह वाटू लागला आहे, त्याचवेळी अमेरिकेलाही भारताबरोबर चांगले संबंध ठेवण्याची इच्छा आहे, हे जी-७ शिखर परिषदेच्या निमित्ताने दिसून आले आहे. आपल्यासाठी हे त्या परिषदेचे फलित आहे. भारताच्या दृष्टीने हे अत्यंत महत्वाचे आहे. जागतिक राजकीय घडामोडींच्या केंद्रस्थानी भारत येऊन पोचला आहे. मोदी सरकारच्या परराष्ट्रनितीचे हे यश म्हणावे लागेल. ■

# पक्ष समर्पित व्यक्तिमत्व

● माधव भांडारी

मुकुंदराव कुळकर्णी ह्यांच्या निधनामुळे महाराष्ट्र भाजपातील जुन्या कार्यकर्त्यांच्या कर्तबगार पिढीमधील त्यागी व समर्पित व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. कै. मुकुंदरावांचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य हे होते की ते जनसंघ व भाजपा ह्या दोन्ही संघटनांच्या वाटचालीत कार्यरत होते. ह्या दोन्ही संघटनांच्या उभारणीत त्यांचा सहभाग होता.

**आणीबाणी** विरोधातील आंदोलनात त्यांनी भाग घेतला होता. त्या पूर्वीच्या काळात मुंबई महानगरातील जनसंघाच्या उभारणीत देखील ते सक्रीय होते. आपल्या आयुष्यातील किमान साठ वर्षे त्यांनी जनसंघ–भाजपासाठी निरलसपणे कार्य केले. त्यापैकी जवळपास ३० वर्षे (सन १९९३ ते २०२२) ते पक्षासाठी पूर्णवेळ काम करत होते. ह्या काळात त्यांनी कधीही कोणत्याही प्रकारची उमेदवारी पक्षाकडे मागितली नाही किंवा 'स्वीकृत सदस्य' म्हणून नियुक्ती मिळावी ह्यासाठी सुद्धा त्यांनी कधी प्रयत्न केला नाही. आपल्या आयुष्याची अनेक मौल्यवान वर्षे पक्षाच्या कार्यासाठी, वाढीसाठी देत असताना त्या बदल्यात त्यांनी पक्षाकडून कसलीही अपेक्षा बाळगली नाही. सामाजिक, राजकीय कार्य करत असताना कोणत्याही प्रकारचा स्वार्थ न बाळगणाऱ्या दुर्मिळ व्यक्तींपैकी मुकुंदराव एक होते. भाजपामधील अशा निरलस राजकीय कार्यकर्त्यांच्या मावळत्या पिढीतील बहुधा ते अखेरचेच होते असे म्हणावे लागेल. अशा व्यक्तींना, कार्यकर्त्यांना 'मूर्ख' नाहीतर किमान 'बावळट' मानण्याची, 'अशा लोकांचा उपयोग



नाही, त्यांची काही गरज नाही' असे म्हणण्याची पद्धत आता सर्वत्र रूढ झाली आहे.

मुकुंदरावांचे बहुतेक आयुष्य मुंबईत गेले १९५८ साली ते मुंबई विद्यापीठातून विज्ञान पदवीधर (B.Sc.) होऊन बाहेर पडले. त्याच वर्षी त्यांना प्रीमियर ऑटोमोबाईल ह्या त्या काळातली 'फियाट पद्मिनी' ही प्रतिष्ठित मोटारगाडी बनवणाऱ्या नामवंत कंपनीत नोकरी मिळाली. नाकासमोर चालण्याचा स्वभाव व आपल्यावर सोपवलेले काम प्रामाणिकपणे करत राहण्याची वृत्ती ह्यामुळे मुकुंदरावांनी तब्बल ३४ वर्षे प्रीमियर ऑटोमोबाईलमध्ये सेवा केली. ह्याही काळात ते नोकरीबाहेरच्या वेळात प्रथम जनसंघाच्या व नंतर भाजपाच्या कामात सक्रीय होते. १९९० साली प्रीमियर ऑटोमोबाईलने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी स्वेच्छा निवृत्तीची योजना लागू केली. तिचा फायदा घेऊन मुकुंदरावांनी स्वेच्छा निवृत्ती स्वीकारली व पूर्ण वेळ भारतीय जनता पार्टीच्या कामाला वाहून घेण्याचे ठरवले. त्यानंतर जवळ जवळ तीस वर्षे त्यांनी विविध स्तरावर भाजपाचे काम केले.

मुकुंदराव स्वभावत: संघटनेचे कार्यकर्ते होते. त्यांना संघटनात्मक कामाची व त्यातही कार्यालयीन कामकाजाची आवड होती. तिला अनुसरून त्यांनी पक्षकार्यासाठी दिलेली ही तीन दशके वेगवेगळ्या स्तरावर पक्षाच्या

कार्यालयांची उभारणी करणे व त्यांच्या व्यवस्था बसवणे ह्या कामात खर्च केली. राजकीय पक्षांमध्ये हे काम बऱ्याच अंशी उपेक्षित व दुर्लक्षित असते. कारण ह्या कामात कोणताही झगमगाट नसतो, व्यासपीठावरील मोठेपणा नसतो, 'नेता' म्हणून दिली जाणारी किंवा मिळणारी शान नसते, मिरवण्याची संधी नसते. राजकीय पक्षाचे कार्यालयीन काम करणे हा सर्व अर्थाने अदखलपात्र व Thankless Job असतो. पण त्याचवेळेला कार्यालयाचे महत्व मात्र फार असते. ते कामकाज बघणाऱ्या व्यक्तीवर जबाबदाऱ्यांचे ओझे मोठे असते. त्यामुळे अशा स्वरूपाचे झगमगाट नसलेले, मोठेपणा न मिळणारे, अदखलपात्र पण जबाबदाऱ्यांचे ओझे लादणारे काम करायला राजकीय कार्यकर्ते फारसे तयार नसतात. ह्या पार्श्वभूमीवर मुकुंदरावांनी ज्या निष्ठेने कार्यालयीन कामकाजाला वाहून घेतले व ते काम ज्या पद्धतीने पार पाडले त्याचे मोल व महत्व फार मोठे आहे.


मुकुंदराव १९९२ साली पक्षाचे पूर्ण वेळ काम करायला लागले तेव्हा ते मुंबई व मुंबईतही अंधेरी भागात सक्रीय होते. त्या जिल्ह्याच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली गेली होती. त्या काळात त्यांनी पुढाकार घेऊन विलेपार्ल्याच्या पूर्व भागात, मुंबई विमानतळापासून अगदी जवळच्या परिसरात अंधेरी जिल्हा भाजपाचे स्वत:चे प्रशस्त कार्यालय उभारले. मुंबई भाजपाचे तेव्हाचे अध्यक्ष कै.रामदासजी नायक, रामभाऊ नाईक व अन्य मुंबईकर भाजपा नेत्यांच्या मनात मुकुंदरावांच्या ह्या क्षेत्रातील कौशल्याबद्दल पूर्ण विश्वास तयार झाला होता. त्यातून मुंबई महानगर भाजपाचे स्वत:चे कार्यालय उभारण्याची जबाबदारी मुकुंदरावांवर सोपवली गेली. मुंबईच्या दादर पूर्व भागात, रेल्वे स्टेशनपासून अतिशय जवळ कथ्थक भवन नावाच्या एका जुन्या इमारतीत प्रथम मुंबई जनसंघाचे व नंतर भाजपाचे महानगर कार्यालय भाड्याने होते. ती इमारत व भूखंड मिळवून त्या ठिकाणी पक्षाची स्वत:ची इमारत उभारण्याचा निर्णय घेतला गेला व ती जबाबदारी मुकुंदरावांवर सोपवण्यात आली. ते काम खूप किचकट व अडचणींनी भरलेले होते. पण ते अशक्य वाटणारे काम कै.रामदासजी नायक व मुकुंदराव कुळकर्णी ह्यांनी पूर्ण केले. आज त्या ठिकाणी मुंबई भाजपाचे भव्य कार्यालय उभे आहे.

त्यानंतर मुकुंदरावांवर महाराष्ट्र भाजपाच्या कार्यालय प्रमुखाची जबाबदारी सोपवली गेली. ती देखील त्यांनी उत्तमरित्या पार पाडली. मुंबईत मंत्रालयाच्या जवळ महाराष्ट्र भाजपाने एक कार्यालय मिळवले होते. ते सुरुवातीला अत्यंत सामान्य व लहान होते. त्या कार्यालयाच्या प्रमुखाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर मुकुंदरावांनी हळुहळू कार्यालयाचा विस्तार केला, अनेक सुधारणा केल्या. कै.मा.प्रमोदजी महाजन, मा.गोपीनाथजी मुंडे ह्यांच्यासह मा.नितीनजी गडकरी व अन्य सर्व प्रदेश नेत्यांचा अतूट विश्वास मुकुंदरावांनी मिळवलेला होता. कै.उत्तमराव पाटील ह्यांच्यासह जनसंघ-भाजपाच्या जुन्या पिढीतील नेत्यांशी त्यांचे चांगले स्नेहसंबंध होते. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांशी सुद्धा त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. मुकुंदरावांच्या कुटुंबातच रा.स्व.संघाच्या कामाचा वारसा होता. त्यांचे थोरले बंधू श्री.अनंतराव कुळकर्णी हे विश्व हिंदू परिषदेच्या स्थापनेपासून तिच्या कामाशी जोडलेले होते. विहिंपचे संघटनमंत्री ही जबाबदारी त्यांनी अनेक वर्षे सांभाळली. स्वत: मुकुंदरावदेखील लहानपणापासून संघाचे स्वयंसेवक होते. त्यांच्या एक भगिनी विवाहानंतर आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात स्थायिक झाल्या होत्या. त्यांचे पती डॉ.फणसळकर भाजपाच्या कामाशी जोडले गेले होते. ते एकदा जिल्हा परिषदेवर निवडून देखील आले होते. त्यांच्या घराशी माझा घनिष्ठ संबंध होता. २००६ साली मी पुन्हा प्रदेशाच्या कामात आल्यानंतर पुन्हा मुकुंदरावांशी संबंध वाढला. त्यावेळी माझ्याकडे प्रवक्ता व प्रसिद्धी ह्या जबाबदाऱ्या होत्या. त्यामुळे मुकुंदरावांशी जवळ-जवळ रोजच संबंध येत असे. त्यांचे बोलणे-वागणे वरकरणी परखड व तुटक वाटणारे असले तरी स्वभावाने ते प्रेमळ होते. वयोमान व तब्येत ह्यानुसार पक्षाच्या कामातून निवृत्त झाल्या नंतरही ते अधून मधून कार्यालयात येत असत. पण नंतर तब्येतीमुळे त्यांना बाहेर फिरणे अशक्य झाले. त्यामुळे त्यांचे कार्यालयात येणेही बंद झाले.

मुकुंदरावांनी वयाच्या ९१व्या वर्षी, १७ जून २०२६ रोजी कृतार्थ भावनेने ह्या जगाचा निरोप घेतला. दादरच्या वसंत स्मृतीमध्ये किंवा नरीमन पॉईंटच्या प्रदेश कार्यालयात पाऊल टाकताना मुकुंदरावांची आठवण येणे अपरिहार्य आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सगळे सहभागी आहोत. ■

# कर्तव्यकठोर संघटक

● **रघुनाथ कुलकर्णी**, माजी प्रदेश संघटन मंत्री




**१९९५ मध्ये मुंबईत झालेल्या विराट अधिवेशनावेळी मुकुंदरावांच्या प्रशासकीय कौशल्याचा परिचय झाला. रेसकोर्स मैदानावर अधिवेशनासाठीचे कार्यालय उभारण्यात आले होते. त्याची जबाबदारी मुकुंदरावांकडे सोपविण्यात आली होती. ही जबाबदारी मुकुंदरावांनी अत्यंत यशस्वीपणे सांभाळली. त्या अधिवेशनाला १ लाखापेक्षाही अधिक कार्यकर्ते आले होते. आलेल्या सर्व कार्यकर्त्यांना प्रस्तावाच्या प्रती वेळच्या वेळी मिळतील, बॅचेस मिळतील, अशी चोख व्यवस्था मुकुंदरावांनी लावली होती. एवढ्या मोठ्या संख्येने कार्यकर्ते येऊनही कुठेही गोंधळ-गडबड झाला नाही. याचे संपूर्ण श्रेय मुकुंदरावांच्या व्यवस्थेला होते.**

**मुकुंदराव** कुळकर्णी हे नाव घेतल्यावर या व्यक्तित्वाची अनेक रूपे झर्रकन डोळ्यापुढे उभी राहतात. संगणकालाही मागे टाकेल अशी बुद्धिमत्ता, कमालीचा टापटीप स्वभाव, शिस्तबद्धता आणि त्या पलीकडे अंतर्बाह्य संघटक अशा अनेक रूपांचे दर्शन मला मुकुंदरावांमध्ये अनेकदा झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून त्यांचे व्यक्तिमत्व घडत गेले. आदर्श संघ स्वयंसेवकांमध्ये असलेले सर्व गुण मुकुंदरावांमध्ये होते. भारतीय जनसंघ आणि त्यानंतर भारतीय जनता पार्टीमध्ये काम करताना त्यांच्यातला स्वयंसेवक कधीच लुप्त झाला नाही. संघ कार्य आणि राजकीय पक्षाचे कार्य यातील फरक जाणून घेऊन त्याप्रमाणे स्वत:ची कार्यशैली तयार करताना मुकुंदरावांनी आपल्या व्यक्तिमत्वातील स्वतंत्रपण नेहमीच जपले. त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावी होते. गोरापान वर्ण, भेदक नजर यामुळे प्रथमदर्शनी त्यांच्या व्यक्तिमत्वाचा समोरच्या माणसावर प्रभाव पडत असे. अनेकांना ते गंभीर स्वभावाचे वाटत असत. त्यामुळे अनेकजण त्यांच्यापासून लांब राहत असत. प्रत्यक्षात मुकुंदराव अत्यंत मोकळ्या स्वभावाचे होते. त्यांच्या दृष्टीने संघटना, संघटनेचा अध्यक्ष, संघटन मंत्री हे अंतिम शब्द होते. मुंबईचे सरचिटणीस, उपाध्यक्ष, मुंबई कार्यालय मंत्री अशा जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर ते प्रदेश कार्यालय मंत्री म्हणून काम पाहू लागले. या काळात त्यांना संघटनेत कनिष्ठ असलेले अनेक कार्यकर्ते अध्यक्ष झाले, सरचिटणीस झाले, मात्र मुकुंदरावांनी त्यांचाच शब्द अंतिम मानला. मी वयाने ज्येष्ठ, संघटनेतही ज्येष्ठ म्हणून तुम्ही माझे ऐका असा आग्रह मुकुंदरावांनी चुकूनही धरला नाही. अध्यक्ष, संघटन मंत्री सांगतील ते काम करणे, झालेल्या कामाचा अहवाल तयार करणे, बैठकांमधून कामाचे अहवाल संबंधितांकडून मागवून घेणे अशा शिस्तबद्ध वाटेने मुकुंदरावांचे काम चालत असे. त्यावेळी दर सोमवारी मुंबईची संघटनात्मक बैठक होत असे. अशा बैठकांमध्ये मुकुंदरावांच्या संघटनात्मक गुणांचा विशेष करून परिचय होत असे. मुंबईच्या संघटन मंत्रीपदाची जबाबदारी माझ्यावर आल्यानंतर मुकुंदरावांना मी जिल्हावार बैठका घेण्यास सांगितले. 'मी जनसंघापासून संघटनेत काम करतो आहे, तू पक्षात काल आला आहेस, तू मला काय काम सांगणार?' अशा अहंकाराने ते कधीच वागले नाहीत. आपण बरे आणि आपले काम बरे, असा त्यांचा खाक्या होता. प्रदेश कार्यालयात किंवा मुंबई कार्यालयात संघटनेचा एक पैसाही अनावश्यक खर्च होणार नाही, याकडे त्यांचे बारीक लक्ष असे. प्रदेश कार्यालय मंत्री असताना त्यांनी पाठपुरावा करून कार्यालयाचे वीज बिल कमी करून घेतले. राज्यामध्ये वेगवेगळ्या बैठकांच्या निमित्ताने त्यांचा प्रवास होत असे. प्रवासाहून परत आल्यावर बैठकांचा अहवाल अध्यक्ष आणि संघटन मंत्र्याला वेळेत देण्याचा नियम त्यांनी कधीच चुकवला नाही. राष्ट्रीय नेता, पदाधिकारी मुंबईत येणार असेल तर संघटनेकडून सांगितल्याशिवाय त्या नेत्याच्या स्वागताला विमानतळ अथवा रेल्वे स्थानकावर ते कधीच गेले नाहीत. आपल्या जबाबदारीच्या वर्तुळात ते कायम वावरले.आपल्या अनुभवाचा आधार घेऊन ते माझ्यासारख्या नवागतांना काही गोष्टी सांगत असत. अशा कर्तव्य कठोर संघटकाला विनम्र नमन. मुकुंदरावांसारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या त्यागाच्या बळावरच आज पक्ष विस्तारला आहे. ■

# निस्पृह कर्मयोगी

● आ. पराग अळवणी



**मुकुंदरावांशी** माझा परिचय १९८४-८५ मध्ये झाला. त्यावेळी मी काम करीत असलेल्या भागात भाजपाचे जिल्हा कार्यालय म्हणजे मुकुंदरावांचे घर. पक्षाची प्रत्येक बैठक त्यांच्या घरी होत असे. पक्षाच्या कामात आलो तेव्हा मी खूपच लहान होतो. मुकुंदरावांची पहिली भेट झाली तेव्हा ते गंभीर व्यक्तिमत्वाचे वाटले. प्रत्यक्षात मात्र ते अत्यंत हळवे तितकेच मोकळेही होते. मुंबईतील तरुण कार्यकर्त्यांच्या पिढ्या घडवणारा निस्पृह संघटक, असे त्यांचे एका वाक्यात वर्णन करता येईल. संघटना चालवताना पदाधिकारी म्हणून काम करताना कोणती पथ्ये पाळली पाहिजेत, संघटन तत्वांचा अंमल कसा केला पाहिजे, याचे धडे मुकुंदरावांनी माझ्या सारख्या अनेक कार्यकर्त्यांना दिले. माझ्यासह अनेकजण मुकुंदरावांच्या तालमीतून तयार होऊन पक्ष कार्य करीत आहेत. मुकुंदरावांनी घडविलेले अनेक जण मंत्री झाले, खासदार झाले, आमदार-नगरसेवकही झाले. अनेकांना संघटनेत महत्वाची पदे मिळाली. मात्र आम्हाला कुणालाच मुकुंदरावांची शिकवण विसरता येत नाही. मी पक्षाच्या कामात आलो तेव्हा मुकुंदराव जिल्हा सरचिटणीस होते. पक्षात मोजकेच कार्यकर्ते सक्रिय होते. या मोजक्या कार्यकर्त्यांकडून संघटनेला अपेक्षित असलेले काम करवून घेण्याची विलक्षण हातोटी त्यांच्याकडे होती. तरुण कार्यकर्त्यांशी संवाद साधताना ते त्या कार्यकर्त्याशी भावनिक नाते जोडत असत. आपल्या वर्तणुकीतून ते तरुण कार्यकर्त्यांना अनेक धडे देत असत. कार्यकर्त्यांशी भाविनक नाते तयार झाल्यामुळे कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याबद्दल कमालीचा आदर होता. कालांतराने त्यांच्यावर मुंबई कार्यालय प्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांच्या कामाचा व्याप वाढला. तरीही आमच्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांकडे, घडामोडींकडे त्यांचे बारीक लक्ष असे. आमच्या जिल्ह्यातील संघटनात्मक बाबींमध्ये मुकुंदरावांचा शब्द अंतिम असे. सर्व कार्यकर्त्यांसाठी मुकुंदराव हे पालक होते. पक्षातील नियुक्तीवरून किंवा अन्य कारणांवरून एकमत झाले नाही तर आम्ही सर्वजण मुकुंदरावांकडे जात असू. मुकुंदराव निर्णय देतील तो अंतिम असे. पक्षातील वाद, किरकोळ कुरबुरी मुकुंदरावांच्या उपस्थितीत संपत असत. संघटनात्मक बैठकीतील मुकुंदरावांना पाहणे हा वेगळा अनुभव असायचा. एखादा माणूस संघटनात्मक बाबींचा कोण-कोणत्या दृष्टीकोनातून किती वेगळा विचार करतो, हे अशा बैठकांमध्ये मुकुंदरावांचे बोलणे ऐकल्यावर कळत असे. पदाधिकारी निवड वा अन्य कारणांवरून कार्यकर्त्यांमध्ये एकमत झाले नाही तर मुकुंदराव दोन्ही बाजूंचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत. त्यांच्या दृष्टीने आवडता कार्यकर्ता, नावडता कार्यकर्ता असे काही नसे. कार्यकर्त्यांमध्ये ते डावं-उजवं कधीच करत नसत. ते ज्याची बाजू घेत त्यामागे त्यांचा ठाम तर्क असायचा आणि आपले म्हणणे ते अत्यंत स्पष्टपणे कार्यकर्त्याला सांगायचे.

## लहानांचाही मान राखणारे मुकुंदराव

**आपल्यापेक्षा लहान कार्यकर्त्याचा मान राखणाऱ्या मुकुंदरावांनी आपले विचारातील मोठेपण अनेकदा मला दाखवून दिले. नगरसेवक झाल्यानंतर माझी सुधार समिती अध्यक्षपदी निवड झाली. या पदामुळे मला महापालिकेचे वाहन मिळाले. एका कार्यक्रमासाठी मुकुंदराव माझ्याबरोबर येणार होते. महापालिकेच्या त्या वाहनात बसण्यापूर्वी त्यांनी मला विचारले, तुझी जागा कोणती? सुरुवातीला मला त्यांच्या प्रश्नामागचा उद्देश लक्षात आला नाही. मी त्यांना म्हणालो, अहो मुकुंदराव त्याचा का एवढा विचार करता, ते म्हणाले तसे नाही, अध्यक्ष म्हणून वाहनात तू तुझ्याच जागी बसले पाहिजे. त्या पदाचा मान मी असो किंवा अन्य कोणी, प्रत्येकाने ठेवलाच पाहिजे.**

वयाच्या ३२ व्या वर्षी माझ्याकडे जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी आली. आमचा जिल्हा आकाराने मोठा होता. संघटनात्मक निवडीमध्ये मी स्थानिक प्रभावी लोकांचे ऐकून निर्णय घेत असे. अशा गोष्टींवरून वाद होऊ नयेत, अशी माझी भूमिका असायची. त्यावेळी मुकुंदरावांनी दिलेला सल्ला मला अजूनही आठवतो आहे. 'पदाधिकारी निवडीबाबत सगळ्यांशी जुळवून घेण्याच्या भूमिकेतून तू निर्णय घेत आहेस, असेच निर्णय घेत राहशील तर तू यशस्वी होणार नाहीस,' इतक्या स्पष्ट शब्दात त्यांनी मला सुनावले होते. ते म्हणाले होते, ''अध्यक्ष म्हणून यशस्वी व्हायचे असेल तर तुला ठाम राहावे लागेल, तू असर्टिव हो,'' असे सांगण्यापूर्वी मुकुंदरावांनी संघटनेतील घडामोडींचे बारकाईने निरीक्षण केले होते.


**जनसंघ ते भाजपा असा प्रदीर्घ प्रवास करणारे मुकुंदराव २-३ वर्षापूर्वीपर्यंत म्हणजे वयाच्या ८८-८९ वर्षापर्यंत पक्षाचे काम करत होते. त्यांच्यासमोर त्यांना कनिष्ठ असणारे अनेक कार्यकर्ते सत्तेत जाऊन बसले. पण या प्रदीर्घ प्रवासात मुकुंदरावांनी एकादाही कोणत्याही सरकारी पदाची, सरकारी लाभाची किंवा अन्य फायद्याची चुकूनही अपेक्षा केली नाही. तसा विचारही त्यांच्या मनाला कधी शिवला नाही. अशी निस्पृहता पाहून अनेकदा थक्क व्हायला होते.**

आपल्या घरात पक्षाचे कार्यालय सुरू करणारा हा माणूस आयुष्याच्या अखेरपर्यंत नि:संग राहिला.

**अशा या निस्पृह कर्मयोग्याला माझी श्रद्धांजली...**

# कडक शिस्तीचे पण तितकेच मायाळू...

**मुकुंदराव** कुळकर्णींना पाहता क्षणी अनेकांना ते रागीट वाटायचे, पण त्यांच्या नजरेत एक जरब असायची. अत्यंत कडक शिस्तीचे सांगीतलेले काम वेळेत झाले पाहिजे. मेहनती तर होतेच वरुन रागीट होते तरी ते आतून मायाळू म्हणजेच फणसासारखे होते, जुन्या कथ्थक भवन पासून प्रदेश कार्यालय व शेवटी मुंबई कार्यालयाच्या ५ व्या मजल्यावर प्रदेशाची लायब्ररी असा त्यांचा प्रवास. कथ्थक भवनमध्ये मुकुंदराव, रघुनाथजी, मी अनेकवेळा चर्चा गप्पा चालायच्या. प्रदेश कार्यालयात अरुण साठेजी फक्त मुकुंदरावाना भेटायला यायचे. मी कार्यालयात असले की आम्ही तिघे एकत्र चहा प्यायचो. २००० साली जेव्हा मी आमदार झाले तेव्हा साठे यांना व मुकुंदरावांना आनंद झालाच, पण जेव्हा मी महिला मोर्चाची राष्ट्रीय सचिव व त्यानंतर राष्ट्रीय महिला अध्यक्षा झाले, तेव्हा त्यांनी प्रमुख महिला कार्यकर्त्यांना बोलावून माझा सत्कार केला होता. त्यांचा स्नेह मला नेहमीच लाभला. कामातला व वागण्यातला काटेकोरपणा ही त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये होती. शेवटी वाचनालय प्रदेशात होते तेव्हा मी अनेक पुस्तके वाचनालयाला दिली, त्यांना फार



समाधान वाटले. प्रदेशात होते तोपर्यंत ते एकाकी नव्हते, पण वसंत स्मृतीत आल्यापासून ते एकटे पडल्यासारखे वाटत होते. त्या वाचनालयात माधवराव भांडारी, रघुनाथ कुलकर्णी आणि मी, रामभाऊ नाईक त्यांना भेटायला जात असू. त्यावेळी ते गप्पांमध्ये जुन्या आठवणीत रमून जात. पक्षाचा खडतर संघर्षकाळ पाहिलेला हा कार्यकर्ता आपल्या अनुभवाचे बोल अनेकदा सांगत असे. त्यावेळी किती कठीण परिस्थितीत त्यांच्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांनी काम केले, हे कळत असे. पक्षाचा इतिहास असेल वा जनसंघ-भाजपा प्रवास असेल सर्व साहित्य वाचनालयात आहे. माझा २०२२ ला जेव्हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला तेव्हा त्यांनी अभिनंदन तर केलेच. माझे कवितांचे पुस्तकही वाचून काढले. जयसिंग नलावडेंशीही त्यांचा स्नेह होता. शेवटी फक्त फोनवर संपर्क राहिला आणि आज ते आपल्यातून निघून गेले. ग्रंथालयातील कर्मचारी प्रविण पाटील आणि सुधाकर राऊळ यांनाही अनाथ झाल्यासारखे वाटत असेल.

**- कांताताई नलावडे**

**माजी राष्ट्रीय अध्यक्ष, महिला मोर्चा / माजी आमदार**

# भाजपाचा ज्ञानकोष

**१ जानेवारी** २०१८ चा प्रदेश कार्यालयातील तो दिवस मला अजून आठवतोय, कारण तो दिवस माझा मुकुंदरावांना भेटण्याचा पहिलाच दिवस होता. तेव्हा मुख्य खुर्चीवर मुकुंदराव बसले होते. कुठलेतरी पुस्तक चाळत होते. तेव्हा कार्यालय मंत्री मुकुंदजींनी माझी ओळख करुन दिली.'मुकुंदराव, हा प्रविण पाटील, नवी मुंबईत राहतो आणि आपल्या पक्षाचा कार्यकर्ता आहे, त्याने ग्रंथालयाचा कोर्स पूर्ण केला आहे,' माझी ओळख करून देऊन मुकुंदजी गेले. मला मुकुंदरावांविषयी एवढीच माहिती होती की ते कडक शिस्तीचे आहेत. त्यामुळे प्रथमच भेटताना मी थोडा घाबरलोच होतो.

त्यांनी माझी विचारपूस करण्यास सुरुवात केली. मला प्रथम असे वाटले की ते सर्व लायब्ररी या विषयावर किंवा लायब्ररीसाठी कोणकोणते सॉफ्टवेअर वापरतात याविषयी विचारतील. मी ती माहिती पाठ करुन गेलो होतो. पण तसे काहीच झाले नाही. त्या दिवशी मला मुकुंदरावांनी भरपूर प्रश्न विचारले. पण ते प्रश्नही विचारीत होते आणि त्यांची उत्तरेही तेच देत होते. मला तेव्हा समजले की या व्यक्तीच्या सानिध्यात आपण आलो तर आपला फार फायदा होईल. कारण ही व्यक्ती म्हणजे भाजपाचा ज्ञानकोष आहे. प्रदेश वाचनालयमध्ये आम्ही दोघेच जण असायचो. मी माझे काम करत असतांना मुकुंदरावांनी कधीच व्यत्यय आणला नाही. त्यांनी सांगितले की तुला ही लायब्ररी तुझ्या लायब्ररी सायन्स नुसार लावायची आहे. मुकुंदरावांचे लायब्ररीवर अतोनत प्रेम होते. जे-जे लायब्ररीसाठी लागेल ते प्रदेशाकडूने मागून घेत.प्रदेशातूनही त्यांना पूर्ण मदत होती.

ते कडक होते पण प्रत्येकावर त्यांची नजर होती मला दोन वेळा फूड पॉयझनिंग झाले होते आणि दहा दिवस मी लायब्ररीत आलोच नव्हतो. मुकुंदरावांना मी कळवूही शकलो नव्हतो. त्यांनी स्वतः मला फोन केला आणि न येण्याचे कारण विचारले. तेंव्हापासून त्यांनी माझे बाहेरचे खाणे बंद केले. ते माझ्यावर भरपूर वेळा रागावत पण नंतर बोलावून प्रेमाने गोंजारत असत. ऑफिसमधील कर्मचाऱ्यांनी नोकरी करता करता पुढे शिकत राहीले पाहिजे, असे ते नेहमी म्हणत असत. माझ्याविषयी त्यांना नेहमीच अभिमान वाटायचा. राम नाईक, विनोद तावडे, विजयराव



पुराणिक, अरुण साठे, कांताताई नलावडे, माधव भांडारी अशा अनेक मोठ्या लोकांना आणि येतील त्यांना सांगायचे की प्रवीणने लायब्ररीमध्ये मास्टर पदवी घेतली आहे आणि आता तो लायब्ररी सायन्स या विषयावर पीएच.डी. करतोय. माझ्याविषयी असे सांगताना त्यांना खूप आनंद होत असे. ते ८७ वर्षांचे असतांना कोरोना फोफावला होता. जसा कोरोना कमी झाला तसे मुकुंदराव पुन्हा कार्यालयात हजर झाले. २०२२ मध्ये लायब्ररी वसंत स्मृती दादरला आली. पाचव्या मजल्यावर लायब्ररीचा संसार थाटण्यात आला. तेव्हा मात्र साहेब एकटे एकटे वाटू लागले होते. ते कमी बोलू लागले, विशेष म्हणजे ते शांत झाले होते. सुधाकर राऊळवर त्यांचे विशेष प्रेम होते. त्याच्या तब्बेतीविषयी माझ्याबरोबर बोलत असत.

मी हिंमत करुन त्यांना बोलायचो की साहेब तुम्ही आत्मचरित्र लिहा, ते पुढील पिढीसाठी फार उपयोगात येईल. पण त्यांनी कधीच होकार दिला नाही. अशा या उत्तुंग व्यक्तीचे सानिध्य मला लाभले, त्यांनी मला वेळोवेळी चांगले सल्ले दिले, ते मला माझ्या जीवनात वेळोवेळी उपयोगात येतात आणि येत राहतील. जनसंघ, भाजपाच्या या चालत्या बोलत्या विद्यापीठाला म्हणजेच मुकुंदरावांना माझी भावपूर्ण श्रध्दांजली.

**- प्रविण पाटील**
**ग्रंथपाल, प्रा. राम कापसे स्मृती ग्रंथालय**
**भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश**






भाजपाचे ज्येष्ठ नेते मुकुंदराव कुळकर्णी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सभा- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, कौशल्य विकास व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा, ज्येष्ठ नेते राम नाईक, रघुनाथ कुलकर्णी, मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, आ. पराग अळवणी, आ. संजय उपाध्याय, माजी आमदार भाई गिरकर आदी.



# महायुतीचा दणदणीत विजय








**विधान परिषद निवडणुकीत विजयी झालेल्या अनुक्रमे सुहास शिरसाठ, बसवराज पाटील, धैर्यशील कदम, राजेंद्र राऊत, नंदकिशोर महाजन, प्रवीण पोटे-पाटील या उमेदवारांनी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची भेट घेतली.**

**राज्यातील** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून विधान परिषदेवर निवडून द्यावयाच्या १७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि महायुतीने दणदणीत विजय मिळवला आहे. सोलापूर, बीड-लातूर, नागपूर, अमरावती, सांगली-सातारा, पुणे, कोकण, अहिल्यानगर अशा १६ जागा जिंकत महायुतीने महाविकास आघाडीला चीतपट केले. या निवडणुकीत महायुतीने ६ जागा बिनविरोध जिंकल्या होत्या. भारतीय जनता पार्टी-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील समन्वय किती मजबूत आहे, हे या निवडणुकीत पुन्हा दिसले. उबाठा, शरद पवार गट आणि काँग्रेसने उपचार म्हणून अत्यंत नाईलाजाने या निवडणुका लढवल्या. यातून महाविकास आघाडी किती गलितगात्र झाली आहे, याचे दर्शन पुन्हा घडले. अनेक ठिकाणी उमेदवारांनी प्रदेश नेतृत्वाला न कळवताच उमेदवारी मागे घेतली. यातून महाविकास आघाडीमध्ये आरोप-प्रत्यारोपही झाले. सोलापूर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या उमेदवाराविरोधात याच पक्षाच्या ४ आमदारांनी महायुती उमेदवाराला उघडपणे साथ दिली. या मतदारसंघात स्थानिक खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी शरद पवार गटाच्या उमेदवाराला अनेक अदृश्य शक्ती मदत करतील आणि त्या मदतीमुळे शरद पवार गटाचा उमेदवार विजयी होईल, असे भविष्य वर्तविले होते. पक्षाचा अधिकृत उमेदवार असूनही शरद पवार गटाच्या ४ आमदारांनी महायुतीचे उमेदवार राजेंद्र राऊत यांना पाठिंबा देत पक्ष नेतृत्वाला तोंडघशी पाडले. पक्षाचे आमदार शरद पवार आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांना जुमानत नाहीत. हे चित्र शरद पवार गटाची दारूण अवस्था दर्शविणारे ठरले. जिल्हा परिषद निवडणुकीवेळी महायुतीतील घटक पक्षांमध्ये काही ठिकाणी मतभेद झाले होते. या मतभेदांचा फायदा महाविकास आघाडीला मिळणार, असे चित्र शरद पवार गटाच्या नेत्यांनी उभे केले होते. सांगली-सातारा मतदारसंघात महायुतीच्या नेत्यांनी समन्वय ठेवत शरद पवार गटाच्या विजयाचे स्वप्न धुळीला मिळवले. ■

# बचत गटांना मिळणार 1 रुपयात जमीन

## शासकीय जमीन भाडेपट्ट्याने देण्याचा राज्य सरकारचा निर्णय

> राज्यातील ग्रामीण भागांतील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, पशुपालनाला चालना देणे आणि शासकीय जमिनींवरील अतिक्रमणांना आळा घालणे या त्रिसूत्री उद्देशाने राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

### पात्रतेच्या प्रमुख अटी

- **या योजनेसाठी महिला बचत गट किंवा ग्रामसंघ हा 'उमेद' अभियानांतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक.**
- **बचत गटाची नोंदणी किमान तीन वर्षांपूर्वी झालेली असावी.**
- **बँक खाते किमान एक वर्ष सक्रिय असावे आणि वार्षिक उलाढाल किमान ५० हजार रुपये असणे बंधनकारक.**
- **जमीन वाटपासाठी सदस्यसंख्येनुसार निकष : दहा महिला सदस्य असल्यास एक हेक्टर, वीस सदस्यांच्या संस्थेला दोन हेक्टर, तर ग्रामसंघाला कमाल पाच हेक्टरपर्यंत जमीन भाडेपट्ट्याने देणार.**

**महसूल** विभागाने 'राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना' जाहीर केली असून या योजनेंतर्गत राज्यातील शासकीय पडीक जमिनी नोंदणीकृत महिला बचत गट, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांच्या बचत गटांना तसेच 'उमेद' आणि 'माविम' अंतर्गत कार्यरत ग्रामसंघांना अवघ्या एक रुपया वार्षिक भाडेपट्ट्याने उपलब्ध करून दिल्या जातील, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व तहसीलदारांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावनिहाय शासकीय जमिनींचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शासकीय जमिनींवरील अनधिकृत अतिक्रमणे हटवून उपलब्ध जमिनींची माहिती गाव नमुना क्रमांक १ (क) मध्ये नोंदविण्यात येणार असून ती संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात येणार आहे. तर, तालुका स्तरावर महसूलमंत्र्यांकडून नियुक्त अध्यक्ष आणि महिला सहअध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली समिती कार्यरत राहील. तहसीलदार हे या समितीचे सदस्य सचिव असतील.

### योजनेचा महिला बचत गटांनी लाभ घ्यावा

**महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ यांचे आवाहन**

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत शासकीय जमीन, चारा, बांबू आणि पिकासाठी सरकारी पडीक जमिनी वार्षिक केवळ एक रुपया नाममात्र भाडेपट्ट्याने देण्याची योजना सुरु केली आहे. या योजनेचा महिला बचतगटांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आ. चित्रा वाघ यांनी केले. ही योजना लागू केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारचे त्यांनी अभिनंदन केले. नवीन धोरणानुसार सरकारच्या आणि शेती महामंडळाच्या पडीक जमिनी, प्रकल्प संपादन केल्यानंतर पडून असलेल्या जमिनी, ग्रामपंचायतीच्या परवानगीने गायरान जमिनी आणि विविध शासकीय विभागांच्या पडीक जमिनी भाडेपट्ट्याने दिल्या जाणार आहेत. महिला सेवा सहकारी संस्था उमेद आणि माविमच्या अंतर्गत नोंदणीकृत झालेले महिलांचे बचत गट, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांचे बचत गट, त्याबरोबरीने ग्रामसंघ आणि महिला बेरोजगारी सहकारी संस्था यांना या जमिनीसाठी अर्ज करता येणार आहे, अशी माहिती आ. चित्रा वाघ यांनी दिली. ■

# गाव चलो अभियानातून असा झाला एका शासन निर्णयाचा प्रवास

**भारतीय** जनता पक्षाच्या लोकसंपर्क अभियानात एक युवक उस्फूर्तपणे एक प्रश्न विचारतो. त्या प्रश्नात स्पर्धा परीक्षेद्वारे संघर्ष करणाऱ्या तमाम तरुणांच्या भावना असतात. अभियानाच्या निमित्ताने गावकऱ्यांशी संवाद साधण्यास गेलेल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना त्या युवकाच्या प्रश्नातली कळकळ जाणवते. या विषयाचा पाठपुरावा केला जातो आणि काही कालावधीनंतर या संदर्भातला थेट शासन निर्णयच निघतो. गावपातळीवरील तरुणांच्या भविष्याचा प्रश्न सोडवण्याच्या दृष्टिकोनातून हा निर्णय आता तरुणाईसाठी लाखमोलाचा ठरला आहे. विषयाचा संपूर्ण उलगडा होण्यासाठी काळाच्या थोडे मागे जावे लागेल.

भाजपने २०२४ साली 'गाव चलो अभियान' हा मंत्र पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिला होता. या लोकसंपर्क अभियानाच्या माध्यमातून गाव पातळीवर थेट संवाद आणि भावना जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य रामकिशन रौंदळे यांनी ५ फेब्रुवारी २०२४ या दिवशी गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील गोळेगाव येथे गाव भेट घेतली. त्यावेळी मराठवाड्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न ज्वलंत होता. गावागावात तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्वस्थता होती. विशेषतः सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांना गावात जाऊन संवाद साधणे कठीण झाले होते. अशा परिस्थितीत रामकिशन रौंदळे जेव्हा गोळेगाव येथे जाऊन पोहोचले तेव्हा त्यांनाही आक्रमक तरुणांच्या प्रश्नांचा सामना करावा लागला. त्यांनी शांतपणे युवकांचे म्हणणे ऐकून घेतले. लोक आधी चर्चेलाच तयार नव्हते. पण संवादाच्या माध्यमातून प्रश्न सुटतात. त्यावेळी मराठा आरक्षणाबरोबरच इतरही अनेक प्रश्न तरुणांनी विचारले. रामकिशन रौंदळे यांनी युवकांच्या भावना समजावून घेऊन त्यांना शांतपणे उत्तरे दिली. मराठा आरक्षणाबाबत बोलताना माननीय देवेंद्र फडणवीस यांच्यात सरकारने मराठा समाजाला आरक्षण दिले पण पुढच्या सरकारला ते न्यायालयात टिकवता आले नाही हे त्यांनी पटवून सांगितले. सारथी




संस्था, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती यावेळी रौंदळे यांनी तरुणांना दिली. त्याचवेळी गावातील युवक उद्धव दुधाटे यांनी रौंदळे यांना प्रश्न विचारला. ज्याप्रमाणे केंद्रीय लोकसेवा आयोगाने मुलाखत फेरीपर्यंत पात्र ठरलेल्या परंतु अंतिम गुणवत्ता यादीत स्थान न मिळालेल्या उमेदवारांसाठी प्रतिभा सेतू पोर्टल विकसित केले आहे त्याच धर्तीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांमध्ये अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचूनही तसेच मुलाखत व कौशल्य चाचणीत उल्लेखनीय यश मिळवूनही अंतिम निवड यादीत स्थान न मिळू शकलेल्या उमेदवारांसाठी निर्णय घेतला जावा असा उद्धव दुधाटे यांचा रास्त प्रश्न होता. रौंदळे यांनी त्यांच्या या प्रश्नाची नोंद घेतली. 'गाव चलो अभियान' अंतर्गत गंगाखेड मतदारसंघातील १७८ क्रमांकाच्या बुधवर झालेला हा संवाद त्यांनी अहवालाच्या रूपाने पक्ष नेतृत्वाकडे कळवला.

अखेर ५ जून २०२६ या दिवशी राज्य शासनाने एक शासन निर्णय जाहीर केला. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अंतिम निवडीत शिफारस न झालेल्या तरुणांच्या भवितव्याबाबत सकारात्मक विचार करण्यात आला. त्यासाठी 'निपुण सेतू' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवल्या गेली. नुकतीच या संदर्भातील शासन निर्णयाची प्रत पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते उद्धव दुधाटे या युवकास देण्यात आली.

**– रामकिशन रौंदळे**

# भाजपा जैन प्रकोष्ठतर्फे शासकीय योजना प्रशिक्षण शिबिर




**भाजपा** जैन प्रकोष्ठ व अखिल भारतीय जैन अल्पसंख्यांक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सेवा दूत शासकीय योजना प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी जैन आर्थिक विकास महामंडळचे अध्यक्ष ललित गांधी होते. यावेळी भाजपा प्रदेश सरचिटणीस आ.निरंजन डावखरे, आ.सुनील कर्जतकर, महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, कार्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. भाजपा जैन प्रकोष्ठचे प्रदेशाध्यक्ष संदीप भंडारी यांनी पदाधिकाऱ्यांना विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती दिली. प्रत्येक शहरात भाजपा जैन प्रकोष्ठच्या कार्यकर्त्यांना सर्व केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचे सविस्तर प्रशिक्षण देऊन गावागावांमध्ये सेवा दूत निर्माण करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. राज्यस्तरीय सरकारी योजना प्रशिक्षण शिबिरानंतर आता विभागीय प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती संदीप भंडारी यांनी दिली. जैन प्रकोष्ठ प्रदेश सरचिटणीस विकास आच्छा, योगेश पाटणी, प्रीती पाटील, सीमा शहा, भरत कोठारी, दर्शना जैन, शोभा कोंडेकर, अभिजीत शहा आदी उपस्थित होते. ■

## पसमंदा मुस्लिमांच्या विकासासाठी शासनाची समिती– इद्रीस मुलतानी यांची अध्यक्षपदी नियुक्ती



**राज्यातील** मुस्लिम पसमंदा समाज आणि लहान जातींचा सर्वांगीण अभ्यास करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाला उपाययोजना सुचवण्यासंदर्भात शासनाने इद्रीस मुलतानी यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय अभ्यास समिती स्थापन केली आहे. या अध्यक्षपदाला राज्यमंत्र्यांचा दर्जा आहे. मुलतानी हे भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. सात सनदी अधिकाऱ्यांचा समावेश असलेली ही राज्यस्तरीय अभ्यास समिती मुस्लिम पसमंदा समाज आणि लहान जातींच्या शैक्षणिक स्थितीचे मूल्यमापन, आर्थिक आणि रोजगाराची स्थिती, त्यांना मिळणाऱ्या सामाजिक आणि पायाभूत सुविधा, महिला आणि तरुणांचे सक्षमीकरण, योजनांची समीक्षा, निधीचा विनियोग याबाबत अभ्यास करणार आहे. या समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक तसेच व्यावहारिक उपाययोजना आणि शिफारशी शासनाला सुचवणार आहे. डेटा संकलन, राज्यातील वेगवेगळ्या विभागांमधील मुस्लिमबहुल भागांमध्ये क्षेत्रीय दौरे, सर्वेक्षण, जनतेकडून सूचना मागवणे अशी कार्यपद्धती असलेली ही समिती एक वर्षात आपला सविस्तर अहवाल आणि शिफारशी शासनाला सादर करेल. भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष असलेल्या मुलतानी यांनी याआधी सिल्लोड पंचायत समितीचे उपसभापती, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आणि भाजपा प्रदेश सचिव या पदांची जबाबदारी सांभाळली आहे. ■




अकोला– उपस्थिती– आ. रणधीर सावरकर, खा.अनुप धोत्रे, जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, महानगर अध्यक्ष जयंतराव मसने, विजु अग्रवाल, अंबादास उमाळे, रवी गावंडे, राजेश बेले, माधव मानकर, दादाराव पेठे, विठ्ठल वाकोडे, संजय कोरडे, किशीर कुचके, नितीन लांडे, राजू नागमते, संदीप गावंडे, अजिंक्य राऊत, राजू ठाकरे, प्रवीण हगवाणे, मधु पाटकर, भरत कालमेघ, विवेक भरणे आदी.




कराड (जि.सातारा)– उपस्थिती– भाजपा किसान मोर्चा प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ, जिल्हाध्यक्ष सूर्यकांत पडवळ, प्रशांत भोसले, रुक्मिणी जाधव,शंकरकाका शेजवळ, संजय घोरपडे, विकास गायकवाड, शहाजी मोहिते, बाळासाहेब पोळ, नवीन जगदाळे, संजय घाडगे,नम्रता कुलकर्णी, उषा नलवडे आदी.



वेंगुर्ला (जि.सिंधुदुर्ग)– उपस्थिती– जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, मुळदे कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी आदी.




नाशिक- आणिबाणीला ५१ वर्षे पूर्ण झाल्याच्यानिमित्ताने कार्यक्रम- प्रमुख वक्ते ज्येष्ठ नेते रघुनाथ कुलकर्णी- उपस्थिती- आ.सीमा हिरे, शहराध्यक्ष सुनील केदार, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, विजय साने, शैलेश जुन्नरे, जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव, प्रशांत जाधव, प्रदीप पेशकार, रोहिणी नायडू, सुनील देसाई, रश्मी बेंडाळे, नाना शिलेदार आदी.



जालना- आणीबाणीविरोधात सत्याग्रहात भाग घेतलेल्यांचा सत्कार- उपस्थिती- जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, महेश निकम, सिद्धिविनायक मुळे, सुनील पवार, रघुनाथ दीक्षित, अरुण उपाध्याय, बद्रीनाथ पठाडे, ॲड. विपुल देशपांडे, विजय कामड, नारायण पवार, धनराज काबलिये, अमोल कारंजेकर, वसंत शिंदे, शिवप्रकाश चितळकर आदी.



वेंगुर्ला- आणिबाणीविरोधात सत्याग्रह केल्याबद्दल रा.स्व.संघाचे स्वयंसेवक प्रभाकर मराठे यांचा सत्कार- उपस्थिती- जिल्हा उपाध्यक्ष प्रसंन्ना देसाई, नरहरी खानोलकर, दिना आचार्य आदी.



नाशिक- आणिबाणीविरोधात सत्याग्रह केल्याबद्दल ज्येष्ठ कार्यकर्ते अरुण शेंदुर्णीकर यांचा सत्कार- उपस्थिती- शहर उपाध्यक्ष रवींद्र पाटील, प्रदीप पाटील आदी.



नाशिक- आणिबाणीविरोधात सत्याग्रह केल्याबद्दल ज्येष्ठ कार्यकर्ते गणपत बोरसे यांचा सत्कार- उपस्थिती- जिल्हाध्यक्ष सुनील केदार, चंद्रशेखर पंचाक्षरी, दिगंबर धुमाळ, महेश महांकाळे आदी.




अनुसूचित जाती समाजाच्या सक्षमीकरणासाठी कार्यकर्ता संमेलन- उपस्थिती- मुंबई भाजपा अध्यक्ष आ. अमित साटम, मुंबई सरचिटणीस आचार्य पवन त्रिपाठी, मुंबई सरचिटणीस राजेश शिरवडकर, ज्येष्ठ नेते शरद कांबळे, मुंबई महिला मोर्चा अध्यक्षा योजना ठोकळे, नगरसेवक प्रतीक कर्पे, मुंबई युवा मोर्चा अध्यक्ष दीपक सिंह आदी.







कल्याण- महिला मोर्चातर्फे इंधन संरक्षण व खाद्यतेल बचत जनजागृती अभियान- उपस्थिती- नगरसेविका हेमा पवार, नगरसेविका रेखा चौधरी, महिला मोर्चा प्रदेश सचिव प्रिया शर्मा, सलोनी ओडिया, मधुरा जोग, दीपा शहा आदी.



मोदी सरकारला १२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त अहिल्यानगर येथील पहाड दर्गा येथे चादर चढवण्यात आली. उपस्थिती- अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सलीम बागवान, मोहसीन शेख, शेख जाहीर, शेख मुजम्मिल, तारीख शेख जुनेद, इमरान शेख आदी.



रत्नागिरी– उबाठाचे जिल्हा संपर्क प्रमुख सहदेव बेटकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे चिपळूण शहर अध्यक्ष व माजी उपनगराध्यक्ष रतन पवार यांचा पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, खा. धैर्यशील पाटील, प्रदेश सरचिटणीस आ. योगेश सागर, प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, आ. प्रमोद जठार, माजी आ. डॉ. विनय नातू, माजी आ. सूर्यकांत दळवी आदी.




उबाठाचे पुणे जिल्ह्यातील कार्यकर्ते ओंकार तुपे-पाटील, मुंबईतील आरपीआय गटाचे नेते ॲड. सुशील शिलवंत यांचा कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश– उपस्थिती– युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष कृष्णराज महाडिक आदी.







नांदेड– एसआयआर प्रशिक्षण कार्यशाळा– उपस्थिती– ज्येष्ठ नेते खा. अशोक चव्हाण, प्रवीण साले, प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, चैतन्यबापू देशमुख, डी.पी. सावंत, महानगराध्यक्ष आ. अमर राजुरकर, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंग रावत, शितल खांडील, विजय येवनकर, विजय गंभीरे, दिलीप कंदकुर्ते, महिला मोर्चा अध्यक्ष ज्योती कल्याणकर, शशिकांत क्षीरसागर, डॉ. सचिन उमरेकर, मिलिंद देशमुख, आशुतोष राजुरकर आदी.






लुधियाना (पंजाब)- उद्योजकांशी संवाद- उपस्थिती- राष्ट्रीय अध्यक्ष खा. नितीन नबीन, राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुग, पंजाब भाजपा अध्यक्ष केवल सिंह ढिल्लो आदी.








बिहारमधील पाटणा येथे २५ जून रोजी संविधान हत्या दिनाच्या निमित्ताने माजी राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा यांनी आणिबाणीविरोधी लढ्याचे नायक जयप्रकाश नारायण यांच्या स्मृतीला अभिवादन करत आणिबाणीविरोधातील लढ्यामध्ये भाग घेतलेल्या कार्यकर्त्यांचा सत्कार केला. जयप्रकाश नारायण यांच्या निवासस्थानी हा कार्यक्रम झाला. पाटणा येथे श्री. नड्डा यांनी संविधान हत्या दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात मार्गदर्शन केले. यावेळी मुख्यमंत्री सम्राट चौधरी, ज्येष्ठ नेते गिरीराज सिंह आदी उपस्थित होते.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com